मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, बुधवार, २५ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ९५ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## हिंदी बिग बॉससाठी मराठी बिग बॉस लवकर संपणार?

**मुंबई :** बिग बॉस मराठीचे यंदाचे पर्व हे सुरुवातील 100 दिवसाचे असल्याचे जाहीर केले होते मात्र आता हा हा शो 70 दिवसात संपणार असल्याचे बिग बॉसने जाहीर केले आहे. बिग बॉसने नुकतीच याबाबत घोषणा केली. मराठी बिग बॉस सध्या प्रसिद्धी शिखरावर असताना, तसेच टीआरपीचे सर्व रेकॉर्ड ब्रेक होत असताना बिग बॉसने अचानक हा शो 70 दिवसाचा का केला, असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. सलमान खान याचे हिंदी बिग बॉस हे येत्या 6 ऑक्टोबरला सुरू होणार आहे. अशात हिंदी बिग बॉस सुरू झाले तर मराठी बिग बॉसचा हिंदी शोला मोठा फटका बसू शकतो.



भारत आणि चीनमध्ये सँडविच बनणार नाही
पान 8

# आमचं दैवत पवारसाहेबच!
## अजित पवार यांचा पश्चाताप की रणनितीचा भाग?

**प्रतिनिधी**
■ **करमाळा**

महायुतीत एकाकी पडलेल्या अजित पवारांनी 'आमचं दैवत पवारसाहेबच' असं म्हटलंय. त्यामुळे खरच अजित पवारांना पश्चाताप होतोय की विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर त्यांच्या रणनितीचा भाग आहे, याबद्दल चर्चा सुरु झाली आहे.



लोकसभेत अजित पवारांच्या पक्षाची चांगली कामगिरी झाली नाही. त्यात बारामतीत पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव अजित पवारांच्या जिव्हारी लागला. हे कमी होतं की काय मित्र पक्षातील भाजपचे अनेक नेते आणि शिंदे सेनेचे मंत्री अजित पवारांच्या अर्थखात्यावर आणि त्यांच्या पक्षावर उघडपणे टीका करतात.

महायुतीत अजित पवार नकोसे असं चित्र असताना अजित पवारांचं शरद पवारांबद्दलचं वक्तव्य राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरलाय. करमाळयात जनसन्मान यात्रेत शरद पवार हे आमचे दैवत आहेत. आम्ही चुकलो तर कान धरा, असं विधान अजित पवारांनी केलंय. मात्र या वक्तव्यानं अजित पवार भावनिक राजकारण करतायत का? असा सवाल उपस्थित होतोय. काही दिवसांपूर्वी 'कुटुंब सोडणं माझी चूक होती' अशी जाहीर कबुली अजित पवारांनी गडचिरोलीच्या कार्यक्रमात दिली होती. मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांची मुलगी भाग्यश्री आत्राम - हलगेकर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार होती. त्यामुळे त्यांचं मन वळवण्यासाठी दादांनी आपल्या घरात फूट पडल्याची जाहीररित्या कबुली दिली होती.

अजित पवार यांच्या या विधानामुळे विरोधकांना आयतं कोलित मिळणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अजित पवारांनी शरद पवारांवर टीका करणं टाळलं होतं.

एवढंच नव्हे तर बारामतीच्या लढतीत भाजपच्या नेत्यांनाही पवारांवर टीका करण्यापासून रोखलं होतं. आता 'पवार साहेब आमचं दैवत' या वक्तव्यामुळे अजित पवारांना खरंच पश्चाताप होतोय की विधानसभा निवडणुकीच्या रणनितीचा हा भाग आहे याबाबत जनतेला प्रश्न पडला आहे.

# 'एमएमआर'मधील दळणवळण,पायाभूत सुविधेच्या प्रकल्पांना गती द्या - मुख्यमंत्री

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**



मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची बैठक आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. मुंबई महानगर क्षेत्रातील दळणवळण, पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकास वाढविण्याच्या प्रकल्पांना गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. बॅकबे रिक्लेमेशन प्रारूप विकास आराखडा, बदलापूर ते विरार-अलिबाग मल्टीमोडल कॉरीडॉर प्रवेश नियंत्रित महामार्गासाठी सल्लागाराची नेमणुक आदी विषयांना यावेळी मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली.

एमएमआरडीएच्या माध्यमातून सुमारे अडीच लाख कोटींची विकास कामे सुरू असून ती कालमर्यादेत पूर्ण करावीत, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी आदी यावेळी उपस्थित होते.

बॅकबे रिक्लेमेशन योजनेचा सुधारित विकास आराखडा सादर करण्यात आला. त्यामध्ये समुद्रकिनारे आणि खारफुटीसारख्या नैसर्गिक वैशिष्ट्यांवर विशेष लक्ष देऊन या क्षेत्राचे निवासी आणि व्यावसायिक क्षेत्रांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. याभागात पर्यटनाला चालना मिळण्यासाठी 'मरिना' पर्यटन प्रकल्पाचा समावेश असून त्यामध्ये लहान बोटी आणि नौकांसाठी खास बंदर असणार आहे. हा सुधारित प्रारूप आराखडा मंजुर करून नागरिकांच्या सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्याची मान्यता देण्यात आली.

कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापूर या शहरांची मुंबई व नवी मुंबईशी थेट जोडणी करणेकरीता सल्लागाराने तयार केलेल्या बदलापूर ते विरार-अलिबाग मल्टीमोडल कॉरीडॉर या प्रवेश नियंत्रित महामार्ग प्रकल्पाचा प्राथमिक आखणी अहवालास मान्यता देण्यात आली. या मल्टीमोडल कॉरीडॉर प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यासही यावेळी मान्यता देण्यात आली.

## पावणे दोन लाख कोटी लुटणाऱ्यांची नावे उघड करा!



**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा बाजार नियामक SEBI वर निशाणा साधला आहे. SEBI ने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे, ज्यात गेल्या 3 वर्षात शेअर बाजारातील 'फ्यूचर अँड ऑप्शन' ट्रेडिंगमुळे छोट्या गुंतवणूकदारांचे 1.8 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती दिली आहे. यावर राहुल गांधी म्हणतात की, छोट्या गुंतवणूकदारांच्या तोट्यातून पैसे कमावणारे 'मोठे खेळाडू' कोण आहेत? हे सेबीने सांगावे. गांधींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, "गेल्या 5 वर्षांत फ्यूचर आणि ऑप्शन ट्रेडिंगमध्ये 45 पट वाढ झाली आहे. हे अनियंत्रितपणे वाढले आहेत. गेल्या तीन वर्षांत 90 टक्के छोट्या गुंतवणूकदारांचे 1.8 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. या छोट्या गुंतवणूकदारांच्या तोट्यामुळे फायदा झालेल्या तथाकथित 'मोठ्या खेळाडूंची' नावे सेबीने जाहीर करावीत." दरम्यान, यापूर्वीही राहुल गांधी यांनी शेअर बाजारातील अनेक ट्रेंडबाबत सेबीच्या कार्यशैलीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. तर, देशातील प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस अनेक दिवसांपासून सेबीच्या अध्यक्षा माधबी बुच यांच्यावर टीका करत आहे.

# शाळेचे ट्रस्टी मानवी तस्करी आणि चाईल्ड पॉर्नोग्राफीत सहभागी असल्याचा आरोप

**प्रतिनिधी**
■ **बदलापूर/मुंबई**

बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेच्या चकमकीला वेगळ वळणं लागण्याची शक्यता आहे. बदलापूर अत्याचार घटनेचा गुन्हा नोंद झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्या शाळेतून अन्य एक मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार त्याच पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाला होता. या शाळेचे ट्रस्टी मानवी तस्करी आणि चाईल्ड पॉर्नोग्राफीत सहभागी असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्याची मागणी केली गेली.

सीबीआय या प्रकरणाचा तपास करणार आहे. सीबीआय चौकशीची मागणी करणारी याचिका केतन तिरोडकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली. बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा चकमकीत मृत्यू झाला. तळोजा तुरुंगातून बदलापूरला ट्रन्सिट रिमांडवर नेत असतांना अक्षयने पोलिसांची बंदूक हिसकावून गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसांनी

### बदलापूर प्रकरणात नवा ट्विस्ट




आत्मरक्षणासाठी त्याच्यावर गोळ्या झाडल्या. यात अक्षयचा मृत्यू झाला. मात्र अक्षयच्या कुटुंबियांनी पोलिसांनी हेतुपूरस्क अक्षयचा एन्काऊंटर केल्याचा आरोप केला. कोणीतरी पोलिसांना त्याला मारण्यासाठी पैसे दिल्याचा आरोपही अक्षयच्या कुटुंबियांनी केला.

चकमकीमागील सत्य समोर आलं पाहिजे, आम्हाला न्याय मिळाला पाहिजे. अक्षयच्या कुटुबियांनी त्याचा मृतदेह ताब्यात घेण्यापासून नकरा दिला. अक्षय शिंदेची चकमक बनावट असल्याचा आरोप विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केला आहे. बड्या आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्यानं संपूर्ण तपास तातडीनं सीबीआयकडे वर्ग करण्याची मागणी आता केली जात आहे. याप्रकरणी आरटीआय कार्यकर्ता केतन तिरोडकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असून लवकरच सुनावणी अपेक्षित आहे.

दरम्यान उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत अजून मोठे खुलासे करण्यात आले आहेत. अक्षय शिंदेनं पोलिसांकडे पान 8 वर

## महत्त्वाचे

### हरिणी अमरसूर्या श्रीलंकेच्या नव्या पंतप्रधान



**कोलंबो :** श्रीलंकेत अनुरा कुमार दिसानायके राष्ट्रपती झाल्यानंतर आता नव्या पंतप्रधानांनीही शपथ घेतली आहे. हरिणी अमरसूर्या यांनी मंगळवारी श्रीलंकेच्या नव्या पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. दरम्यान, सिरिमावो भंडारनायके यांच्यानंतर पंतप्रधान म्हणून हे पद भूषवणाऱ्या हरिणी अमरसूर्या या देशातील दुसऱ्या महिला नेत्या ठरल्या आहेत. 'नॅशनल पीपल्स पॉवर'च्या 54 वर्षीय नेत्या हरिणी अमरसूर्या यांना राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांनी शपथ दिली.

### दुसऱ्या कसोटीसाठी 3 खेळाडू संघाबाहेर 'गंभीर' निर्णय

**कानपूर :** गौतम गंभीर यांनी दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी अचानक तीन खेळाडूंना संघाबाहेर केल्याचे आता समोर आले आहे. भारताचा दुसरा कसोटी सामना हा कानपूर येथे होणार आहे. हा सामना 27 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. हा सामना आता काही दिवसांवर आला असून गंभीर यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. भारतीय संघातील तीन खेळाडूंना यावेळी संघाबाहेर ठेवण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. आता हे तिन्ही खेळाडू भारतीय संघाबरोबरही राहू शकणार नाहीत. भारताने पहिला कसोटी सामना जिंकला. त्यानंतर भारतीय संघ चेन्नईमधून कानपूर येथे दाखल झाला. कानपूर येथे दाखल झाल्यावर गंभीर यांनी हा मोठा निर्णय घेतल्याचे आता समोर आले आहे.

# निवडणुकीदरम्यान मतभेद बाजूला ठेवा, गटबाजी खपवून घेणार नाही
## अमित शाहांनी टोचले कान

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

'पार्टी विथ अ डिफरन्स' अशी प्रतिमा असलेल्या भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नागपुरात येऊन पक्षातील गटबाजीवरून पदाधिकाऱ्यांचे कान टोचले. राजकारणात काम करत असताना अनेकदा मतभेद होत असतात. तर विविध कारणांमुळे अनेकांना उमेदवारी मिळत नाही. त्यातून गटबाजी निर्माण होते. मात्र निवडणूक काळात पक्षात अशी गटबाजी खपवून घेणार नाही. सर्वांनी अंतर्गत मतभेद बाजुला सारून एकत्रित निवडणूकीचे काम केले पाहिजे, असे प्रतिपादन अमित शाह यांनी केले. विशेष म्हणजे पदाधिकाऱ्यांकडून त्यांनी ही बाब वदवून घेतली. नागपुरात प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीदरम्यान ते बोलत होते.



कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पक्षाचे राज्य प्रभारी भूपेंद्र यादव, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे प्रामुख्याने उपस्थित होते.

एका तिकीटासाठी अनेक दावेदार असतात. मात्र सर्वेक्षण, जातीय समीकरणे इत्यादी बाबी पाहून उमेदवारी निश्चित करावी लागते. जर तिकीट मिळाले नाही तर त्यावरून कुणीही असंतुष्ट होऊन त्यावर गोंधळ घालत आहे असे प्रकार विदर्भात दिसायला नको, असे परखड मत अमित शाह यांनी व्यक्त केले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचा धनुष्यबाण व अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे चिन्ह असलेल्या घड्याळीच्या उमेदवारांचा कमळाप्रमाणेच पूर्ण ताकदीने प्रचार झाला पाहिजे, असे अमित शाह यांनी स्पष्ट केले.

**विदर्भात 45 जागा हव्यात**

भाजपचे महाराष्ट्रातील नेते विदर्भात महायुतीला 40 ते 42 जागा मिळाव्यात यासाठी प्रयत्न करत आहेत. मात्र जर महाराष्ट्रात सत्ता हवी असेल तर विदर्भात कमीत कमी 45 जागांवर विजय आवश्यक आहे. त्यामुळे त्या दृष्टीने नियोजन करायला हवे, असे निर्देश अमित अमित शाह यांनी दिले. पान 8 वर

### अमित शहा विदर्भात मात्र नितीन गडकरी काश्मीरात

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत. नागपूर येथे विदर्भातील विधानसभा मतदारसंघांचा ते आढावा घेत आहेत. मात्र, त्यांच्या या आढावा बैठकीला केंद्रीय मंत्री आणि भाजपचे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते नितीन गडकरी उपस्थित राहीले नाहीत. विदर्भातील बैठकीलाच नितीन गडकरी यांची अनुपस्थिती आता चर्चेचा विषय ठरली आहे. त्यामुळे नितीन गडकरी यांना मुद्दाम विधानसभा निवडणुकीपासून दूर ठेवले जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. यासंदर्भात भाजपच्यावतीने देखील स्पष्टीकरण देण्यात आले आहे. नितीन गडकरी हे जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार दौऱ्यावर जात आहेत. नितीन गडकरी यांचा जम्मू-काश्मीरमधील निवडणूक प्रचाराचा नियोजित दौरा आहे. त्यामुळे ते या बैठकीला उपस्थित नसल्याची माहिती भाजपच्यावतीने देण्यात आली आहे. मात्र केंद्रीय गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या महत्त्वाच्या बैठकीलाच विदर्भातील महत्त्वाचा नेता उपस्थित नसल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

## मोदी- झेलेन्स्कींची तीन महिन्यांत तिसऱ्यांदा भेट

**न्यूयॉर्क :** भारताचे परराष्ट्र धोरण आणि इतर देशांशी असलेल्या संबंध, याबाबत नेहमीच चर्चा होते. दरम्यान, आता भारताने रशियासोबतच्या आपल्या पारंपारिक संबंधांना धक्का न लावता, युक्रेनशी आपले संबंध मजबूत करणे सुरू केले आहे. याच पार्श्वभूमीवर अमेरिका दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये युक्रेन-रशिया परिस्थितीवर चर्चा झाली. महत्वाची बाब म्हणजे, झेलेन्स्की आणि मोदी यांच्यातील गेल्या तीन महिन्यांतील ही तिसरी बैठक होती.

# 'लाडकी बहीण योजना' मतांसाठी केलेला जुगाड
## भाजप आमदाराच्या वक्तव्यामुळे खळबळ

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

"लाडकी बहीण योजना मतांसाठी केलेला जुगाड आहे", असं वक्तव्य कामठीचे भाजप आमदार टेकचंद सावरकर यांनी एका कार्यक्रमादरम्यान केलं. या कार्यक्रमाचा व्हिडिओ विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी 'एक्स'वर शेअर करत भाजपचा खरा चेहरा उघड झाल्याची टीका केली होती. "अखेर महायुतीची भानगड पुढे आली! महायुतीला मतांचा दुष्काळ आहे, म्हणून लाडकी बहीण योजना मतांसाठी केलेला जुगाड आहे. भाजपच्या या आमदाराने मान्य केलं की,



महायुतीतील सर्व नेते खोटं बोलतात. लाडकी बहीण योजना माता भगिनींना लाभ देण्यासाठी नव्हे तर मत पेटीतून लाभ घेण्यासाठी आहे", असं विजय वडेट्टीवार यांनी ट्वीटमध्ये म्हटलं आहे. यावर आमदार टेकचंद सावरकर यांनी खुलासा केला आहे.

विजय वडेट्टीवार यांनी शेअर केलेल्या व्हिडीओत टेकचंद सावरकर भाषण करताना दिसत आहेत. ते हिंदीत भाषण करत होते. "अभी हम इतना बडा भानगड काय के लिए किया वह बताओ जरा. इमानदारी से बताओ. अंत:करण से. जिस दिन तुम्हारे घर के सामने इलेक्शन की पेटी आएँगी, तो मेरी ये लाडली बहना, कमल को वोट देंगी, इसके लिए तो हमने यह जुगाड किया. यह सब सही बोलते हैं. सब झूट बोलते रहेंगे, मैं सही बोल रहा हूँ. नहीं तो बताने का यह और करने का वोह, पान 8 वर

### मराठा आंदोलकांचा संयम सुटला
# जरांगेंच्या आंदोलनाच्या 8 व्या दिवशी थेट तहसीलदारांचीच खुर्ची पेटवली



**प्रतिनिधी**
■ **फुलंब्री**

मराठा आंदोलकांनी आरक्षणाच्या मागणीसाठी थेट तहसीलदारांची खुर्ची पेटवून दिल्याची घटना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यात घडली आहे. या घटनेमुळे शांततेत आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांचा संयम आता सुटत चालला असल्याचे चित्र आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवाली सराटीत बेमुदत उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आजचा 8 वा दिवस आहे. पण सरकारने अद्याप त्याची दखल घेतली नाही. यामुळे मराठा आंदोलक चांगलेच आक्रमक झालेत. या आंदोलकांनी मंगळवारी सकाळी फुलंब्री तहसील कार्यालयात येऊन जोरदार नारेबाजी केली. त्यानंतर तहसीलदारांच्या दालनातून त्यांची खुर्ची बाहेर आणून ती पेट्रोल टाकून पेटवून दिली. मनोज जरांगे यांच्या उपोषणाची दखल घेण्यासाठी आंदोलकांनी हे कृत्य केले. तसेच भविष्यात याहून अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही दिला. मंगेश साबळे नामक तरुणाच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद येथेही मराठा आंदोलकांनी सरकारचा प्रतिकात्मक पुतळा जाळून सरकारच्या भूमिकेचा निषेध केला. या प्रकरणी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर सायंकाळी त्यांची सुटका करण्यात आली.

जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. पण त्याला ओबीसी नेत्यांनी तीव्र विरोध केला आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी यासंबंधी आंतरवाली सराटी येथून जवळच असलेल्या वडीगोद्री येथे उपोषण सुरू केले आहे.



# भारतात लैंगिक शिक्षण गरजेचं
## लैंगिक शिक्षण पाश्चात्य संकल्पना नाही

**वृत्तसंस्था**
■ **नवी दिल्ली**

लैंगिक शिक्षणाला पाश्चिमात्य संकल्पना मानणे चुकीचे असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने एका निर्णयात म्हटले आहे. यामुळे तरुणांमध्ये अनैतिकता वाढत नाही. त्यामुळे त्याचे शिक्षण भारतात खूप महत्त्वाचे आहे.

लैंगिक शिक्षण हे भारतीय मूल्यांच्या विरोधात असल्याचे लोक मानतात, असे न्यायालयाने म्हटले आहे. याच कारणामुळे अनेक राज्यांमध्ये लैंगिक शिक्षणावर बंदी घालण्यात आली आहे. या विरोधामुळे तरुणांना अचूक माहिती मिळत नाही. मग ते इंटरनेटकडे वळतात, जिथे अनेकदा दिशाभूल करणारी माहिती आढळते. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पारदीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय फेटाळताना ही टिप्पणी केली. न्यायालयाने सोमवारी सांगितले की, चाइल्ड पोर्नोग्राफी डाउनलोड करणे आणि पाहणे हा पॉक्सो आणि आयटी कायद्यानुसार गुन्हा आहे. खरेतर, मद्रास उच्च न्यायालयाने म्हटले होते की, जर कोणी असा मजकूर डाउनलोड करून पाहत असेल तर तो प्रसारित करण्याचा हेतू असल्याशिवाय तो गुन्हा नाही.

### सर्व राज्यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी केंद्राच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे
देशभरातील बालकांच्या लैंगिक छळ घटनांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

शाळांमध्ये मुलांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी सर्व राज्यांनी करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिले. महाराष्ट्रातील बदलापूरसह देशातील विविध ठिकाणी घडलेल्या बालकांच्या लैंगिक छळाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने हे निर्देश दिले आहेत. बालकांच्या लैंगिक छळाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बचपन बचाओ आंदोलन या एनजीओने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. केंद्र सरकारने 1 ऑक्टोबर 2021 रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्यांना द्यावे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरथना यांच्या अध्यतेखालील खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी पार पडली. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांची प्रत सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पाठवण्यास सांगितले आहे. तसेच, केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वांची सर्व राज्यांनी तात्काळ अंमलबजावणी करावी, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

*मुंबई : कांजूर विभागातील सिनेट निवडणुक मतदान केंद्राला शिवसेना तथा युवासेना सचिव वरुण सरदेसाई यांनी भेट देवून मतदानाविषयी माहिती घेतली. सोबत म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना अध्यक्ष बाबा कदम, सिध्दी जाधव, अनंत पाताडे, रवि महाडिक, मामा मंचेकर, श्वेता पावसकर, मामी मंचेकर, योगेश पेडणेकर, लीना मांडलेकर, मिलिंद खानविलकर, सुभाष वर्दम इ.*



## थोडक्यात

### 'थिंकिंग हॅट्स एंटरटेनमेंट सोल्यूशन्स' आयपीओ आज

thinking hats entertainment solutions

**मुंबई:** इव्हेंट मॅनेजमेंट आणि ओटीटी कंटेंट प्रॉडक्शनमधील अग्रगण्य कंपनी थिंकिंग हॅट्स एंटरटेनमेंट सोल्यूशन्स लिमिटेडने २५ सप्टेंबर २०२४ रोजी इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ)द्वारे सार्वजनिक होण्याची घोषणा केली आहे. कंपनीची या आयपीओद्वारे अप्पर बँडमध्ये १५.०८ कोटी रुपये उभारण्याची योजना असून कंपनीचे शेअर्स एनएसई इमर्ज प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध केले जातील.कंपनीने आयपीओकरिता प्रति शेअर ४२ ते ४४ रुपये प्रति शेअर किंमत पट्टा निश्चित केला आहे. कंपनीचे शेअर्स २५ सप्टेंबर २०२४ रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुले होतील आणि २७ सप्टेंबर २०२४ रोजी बंद होतील. इश्यू आकार प्रत्येकी १० रुपयांच्या दर्शनी मूल्यावर ३४,२९,००० इक्विटी शेअर्स पर्यंत आहे. इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर होरायझन मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड आणि रजिस्ट्रार मास सर्व्हिसेस लिमिटेड आहेत.

### गोदी कामगार वेतन करारासाठी 27 सप्टेंबरला मिटिंग

**मुंबई:** भारतातील बंदर व गोदी कामगारांच्या वेतन करारासाठी द्विपक्षीय वेतन समितीची ९ वी मिटिंग शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथे होणार असल्याचे इंडियन पोर्ट असोसिएशनचे व्यवस्थापकीय संचालक विकास नरवाल यांनी सर्व फेडरेशनच्या नेत्यांना कळविले आहे. या मिटींगला द्विपक्षीय वेतन समिती मधील हिंद मजदुर सभा, सिटू, आयटक, इंटक, बीएमएस या केंद्रीय कामगार संघटनेशी संलग्न असणाऱ्या फेडरेशनचे कामगार प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.तर ऑल इंडिया पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन (वर्कर्स) च्या वतीने अध्यक्ष, अ‍ॅड.एस. के. शेट्ये, जनरल सेक्रेटरी, सुधाकर अपराज व खजिनदार, विद्याधर राणे हे उपस्थित असतील.

### 'एअरटेल टी.व्ही'चा नवा प्लॅन

**मुंबई:** एअरटेल डिजिटल टी.व्हीने आपल्या नवीन अल्टिमेट आणि अ‍ॅमेझॉन प्राइम लाइट प्लॅन यांच्या अंतर्गत लाइव्ह टी.व्ही आणि प्राइम लाइट फायदे उपलब्ध करून देण्यासाठी अ‍ॅमेझॉन प्राइम सोबत हातमिळवणी केली आहे. या प्लॅनच्या सबस्क्राइबर्सना एच.डी क्वालिटीच्या 2 डिव्हाइसवर प्राइम व्हिडिओमधून अप्रतिम मनोरंजनाचा आनंद उचलता येणार आहे आणि हे लिनियर टी.व्ही चॅनल्सचा आनंद घेण्याव्यतिरिक्त असणार आहे. प्राइम लाइट सबस्क्रिप्शन मध्ये इतर प्राइम फायदे सुद्धा सामील आहेत, एअरटेल डिजिटल टी.व्ही सबस्क्राइबर्सना 350+ लाइव्ह टी.व्ही चॅनल्स उपलब्ध असणार आहेत.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसईत परतीच्या पावसाचा जोर; भात शेतीला फटका, हवेत गारवा

प्रतिनिधी
■ वसई

वसईत सोमवारपासून परतीच्या पावसाने जोर धरल्यामुळे भातशेतीचे नुकसान झाले आहे. सोमवारी रात्री विजांच्या गडगडाटसह पाऊस कोसळत होता.सखल भागात तयार झालेल्या हलवर पिकांना या पावसाचा फटका बसला असून शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तर परतीच्या पावसाने हजेरी लावल्याने हवेत गारवा पसरून साथीच्या आजारांचा फैलाव होण्याची शक्यता आहे.

सोमवारी दुपारपासून वसईत परतीच्या पावसाने जोर धरला आहे. या पावसामुळे तयार होत आलेले व दाणा धरलेले भातपीक शेतात आडवे झाले आहे. ज्या पिकांना जास्त पाण्याची गरज नसते अशा हळवार पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. तसेच वसईच्या पूर्व पट्टीत निम गरवार पिकांना जास्त पाण्याची आवश्यकता आहे, त्या पिकांना हा पाऊस लाभदायक ठरणार आहे. मात्र काही ठिकाणी पहिल्याच पावसाच्या पाण्यावर लागवड झालेली निम गरवार पिके आता तयार झाली असून त्यांना देखील दाणा धरला आहे. मात्र या पावसामुळे निम गरवार पिकांनाही नुकसान पोहोचले आहे

या पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने त्यांच्या उत्पन्नात घट होणार आहे. दरम्यान, परतीच्या पावसाने एकच हजेरी लावल्याने हवेत गारवा निर्माण होऊन साथीचे आजार बळावण्याची शक्यता आहे. तसेच येत्या काही दिवसात परतीचा पाऊस आणखी तडाखा देण्याची शक्यता आहे.

# आधार प्रमाणिकरणासाठी 30 सप्टेंबरपर्यंतची मुदत

## प्रोत्साहन योजना - 146 शेतकरी शिल्लक

प्रतिनिधी
■ पालघर

पिक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून प्रोत्साहनपर लाभ दिला जातो. या लाभासाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने पन्नास हजार रूपये दिले जातात. या लाभासाठी पात्र ठरलेल्या व आधार प्रमाणीकरण न केल्यामुळे लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी आता शासनाने आधार प्रमाणीकरणास 30 सप्टेंबरपर्यंतची मुदतवाढ दिली आहे.

या शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी आवश्यक असलेला निधी सध्या शासकीय तिजोरीत उपलब्ध आहे. हे पैसे योग्य व पात्र लाभार्थ्यांनाच मिळावेत यासाठी आधार प्रमाणिकरण आवश्यक आहे. या योजनेतून राज्यभरातील 33 हजार 356 शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यासाठी दि. 12/08/2024 ते 18/09/2024 या कालावधीत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. या कालावधीत 18 हजार 163 शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण झाले आहे. अदयाप 15 हजार 193 शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण प्रलंबित आहे.

जिल्हा उपनिबंधक शिरीष कुलकर्णी म्हणाले दि. 09 सप्टेंबरपर्यंत आधार प्रमाणीकरण करून घेण्याची पालघर जिल्हयातील 151 खाती शिल्लक होती. त्यापैकी 05 खात्यांचे आधार प्रमाणिकरण झालेले असून 146 खाती अद्याप प्रलंबित आहेत.

उर्वरित लाभार्थ्यांना संबंधीत बँक शाखाधिकारी व सहकार विभागामार्फत संपर्क साधला जात आहे. तरी त्यांच्याशी संपर्क साधून आपले सेवा केंद्रावर जाऊन उर्वरित लाभार्थ्यांनी मुदतीत आधार प्रमाणीकरण करून घ्यावे असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था शिरीष कुलकर्णी यांनी केले आहे.

# पेल्हार येथे खैर लाकूडाच्या तस्करीचा पर्दाफाश

## दोन वाहनांसह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त



प्रतिनिधी
■ वसई

वसई पूर्वेकडील पेल्हार येथे एका गोदामात खैर लाकूड वाहनामध्ये भरत असताना गुप्त माहितीच्या आधारे मांडवी वन विभागाने टाकलेल्या धाडीत या गोदामामध्ये असलेला लाखो रुपयाचा खैरमाल व दोन वाहने जप्त केली आहेत. याप्रकरणी एका वाहनाचा चालक धनंजय महाडिक याला ताब्यात घेतल्याचे मांडवी वनपरिक्षेत्रपाल संदीप चौरे यांनी माहिती दिली.

वसई तालुक्यातील जंगलात तस्करीच्या अनेक घटना घडत असून अनेकदा जंगलातून वाहतूक करताना अनेक वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी वाहने पकडली आहेत. मात्र आता एका गोदामात लाखोचा खैरमाल सापडल्याची तालुक्यातील ही पहिली घटना आहे. पेल्हार परिसर हा तुंगारेश्वर अभयारण्य लगत असल्याने एका गोदामात खैर लाकूड दोन वाहनात भरून या मालाची तस्करी केले जाणार असल्याची गुप्त माहिती मांडवी वन विभागाला मिळाली होती. त्या आधारे ही कारवाई सोमवारी संध्याकाळी करण्यात आली.

वसई तालुक्यात असलेल्या जंगलात खैर लाकूड मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून ते लाकूड गुटखा व कात बनवण्यासाठी वापरले जात असल्याने या लाकडाला बाजारात मोठी किंमत आहे. त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात खैर तस्करीच्या घटना घडत आहेत. मात्र अनेकदा आरोपी अंधाराचा फायदा घेत पळून जात असताना मात्र या गोदामात केलेल्या कारवाईत आरोपी हाती लागल्याने खैर तस्करी करणाऱ्या टोळीचा तपास केला जाणार असल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले.

# भाताणे - मेढे रस्त्याचे काम संथगतीने

## अर्धवट कामामुळे रस्ता चीखलमय

प्रतिनिधी
■ वसई

आमदार फंडातून सुरू झालेले भाताणे - मेढे रस्त्याचे काम सध्या संथगतीने सुरू आहे. अर्धवट कॉंक्रिटीकरण कामामुळे रस्ता चिखलमय झाला आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सोसावा लागत आहे.

भाताणे - मेढे या साधारण १२ किलोमिटरचा रस्ता सध्या कॉंक्रीटीकरण करण्यात येत आहे. या रस्त्याचे काम स्थानिक आमदार राजेश पाटील यांच्या आमदार फंडातून मार्गी लावण्यात येत आहे. मात्र रस्त्याच्या कामात प्रचंड संथपणा असल्याने नागरिकांना हालअपेष्टा सोसाव्या लागत आहेत.



तसेच या रस्त्याचे काम अर्धवट झाले असल्याने बाकीचा रस्ता चिखलमय झाला आहे. त्यामुळे वाहनचालक व नागरिकांना चिखल तुडवत पुढचा प्रवास करावा लागत असल्याने स्थानिक नागरिकांत नाराजीचे वातावरण आहे. त्याचप्रमाणे या रस्त्याचे अद्यापी ७ ते ८ किलो मीटरचे काम बाकी असून ते संथपणे सुरू आहे.

दरम्यान, जांभूळ पाडा ते भाताने असे कॉंक्रीटीकरण झाले असून भालीवली गावात देखील कॉंक्रीटीकरण झाले आहे. आता केवळ ७ ते ८ किमी चे काम बाकी राहिले आहे. स्थानिक आमदार राजेश पाटील यांनी हे उर्वरित काम लक्ष घालून मार्गी लावावे, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे

# पालिका कर्मचाऱ्यांना दिवाळीसाठी सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय लवकरच

## पालिका आयुक्तांचे समन्वय समितीच्या नेत्यांना आश्वासन

प्रतिनिधी
■ मुंबई

दिवाळीसाठी मुंबई महानगरपालिका कामगार कर्मचारी, अधिकारी यांना विधान सभा निवडणुकीची आचासंहिता लागू होण्यापूर्वी सानुग्रह अनुदान देण्याबाबतचा निर्णय लवकरच समन्वय समितीच्या नेत्यांबरोबर चर्चा करून घेण्यात येईल असे आश्वासन पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी काल पालिकेतील कामगार संघटनांच्या समन्वय समितीला दिले. दिवाळी सणाकरीता वार्षिक वित्तलब्धीच्या



२०% सानुग्रह अनुदान (बोनस) मिळावा अशी मागणी समन्वय समितीने आयुक्तांकडे यापूर्वीही निवेदनाद्वारे केली आहे.

आयुक्तांच्या प्रत्यक्ष भेटीवेळी समन्वय समितीच्यावतीने बाबा कदम, वामन कविस्कर, अशोक जाधव, प्रकाश देवदास, दिवाकर दळवी, सत्यवान जावकर, के. पी. नाईक, साईनाथ राजाध्यक्ष, बा. शि. साळवी, शरद सिंह इत्यादी समन्वय समितीचे नेते उपस्थित होते

समन्वय समितीच्या नेत्यांनी कालही आयुक्तांच्या भेटीवेळी त्यांना निवेदन दिले. यावेळी त्यांनी आयुक्तांना, या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात कर्मचाऱ्यांसाठी २३७ कोटींच्या रक्कमेची तरतुद करण्यात आलेली असून दरवर्षी कर्मचाऱ्यांना पहिल्या वर्षापेक्षा वाढीव रक्कमेने सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याची प्रथा असून यावर्षीही बोनसमध्ये भरघोस अशी वाढ करण्यात यावी. तसेच महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेची निवडणूक लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. निवडणुका जाहीर होऊन आचारसंहिता लागू होण्यापूर्वी म.न.पा. कामगार-कर्मचारी-अधिकाऱ्यांना सानुग्रह अनुदान (बोनस) बाबत निर्णय होऊन त्यांना दिवाळी सणापूर्वी देण्यात यावा अशी विनंतीकेली.त्यावेळी आयुक्तांनी लवकरच समन्वय समितीच्या नेत्यांबरोबर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले.

# वसईत शासकीय जमिनींची लुटमार; शासकीय कार्यालये भाड्याच्या घरात

## भूमाफियांना आवळण्यात प्रशासन हतबल

प्रतिनिधी
■ वसई

वसईत शासकीय जमिनींची मोठ्या प्रमाणात लुटमार सुरू आहे. परंतु शासकीय जमिनींचे रक्षण करणारी कार्यालयेच भाड्याच्या वास्तूत असल्याचे चित्र दिसून येते. भूमाफिया दिवसेंदिवस मुजोर होत असताना त्यांना आवळण्यात प्रशासन हतबल असल्याचे सध्याचे चित्र आहे.

वसईत वन, महसूल प्रशासनाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली आहेत. शहरांच्या नियोजनाची जबाबदारी प्रामुख्याने वसई- विरार महापालिकेवर आहे. मात्र सदर प्रशासन ज्या जागेवर अतिक्रमण झाले असेल ती जागा महसूल किंवा वनविभागाची असल्याचे सांगून स्वतःवरील जबाबदारी झटकून टाकत आहे. त्यामुळे महसूल व वनविभागाच्या जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत .

वसईतील मिठागर विभागाच्या जागेवर मात्र एकही अनधिकृत बांधकाम झालेले नाही. किंबहुना मिठागर विभागाने ती होवून दिलेली नाहीत. त्यामुळे जी हिंमत मिठागर विभाग दाखवू शकते ती हिंमत पालिका,महसूल,वनविभाग का दाखवू शकत नाही असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. महसूल, वनविभागाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत तसेच होत आहेत . परंतु पालिका ,महसूल आणि वनविभाग कारवाईसाठी उदासीन कारभार राबवत असल्याने सरकारी जागांची मोठ्या प्रमाणात भूमाफिया लुटमार करत असल्याचे चित्र दिसून येते. मात्र महसूल व वनविभागाची काही कार्यालये भाड्याच्या वास्तूत असल्याची शोकांतिका दिसून येते.




*वसई : सन 2034 पर्यंत वसई -विरारचे असे बकालीकरण होईल? असं एका राजकीय पदाधिकाऱ्याने सोशल मिडियावरती पोष्ट केले आहे. परंतू हे चित्र वास्तविकतेला आधारित धरून आहे. वसईमध्ये जेवढी अनधिकृत बांधकामे होत आहेत. त्याहून कितीतरी पट अवैध चाळी व झोपडपट्ट्यांचा विळखा पडत आहे. त्याचं हे वास्तववादी ज्वलंत चित्र आहे. त्यामुळे आताच वसईकरांनी, राजकारण्यांनी व पालिका प्रशासनाने जागे होऊन वसई टिकविण्यासाठी धडपड केली पाहिजे. नाहीतर 2034 पर्यंत वसई उध्वस्त झालेली दिसेल, याचं हे उदाहरण आहे.*

# घाटकोपरमधून 40 लाख रुपयांच्या विदेशी सिगारेटी जप्त

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई पोलीसांकडुन संपुर्ण मुंबई आणि मुंबईच्या आजुबाजुच्या परीसरात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित विदेशी व इलेक्ट्रॉनिक्स सिगारेटीवर कार्यवाही चालू असतांना. तब्बल 40 लाख रुपयांच्या विदेशी सिगारेटीचा साठा घाटकोपर (पश्चिम) येथील एका कुरीअर ऑफीसमध्ये सापडला.

पोलीसांनी दिलेल्या माहीतीनुसार मुंबई पोलीसांनी मुंबई आणि आजु-बाजुच्या परीसरात केलेल्या कार्यवाहीत आतापर्यंत सुमारे ४० लाखापर्यंतच्या रुपयाच्या विदेशी सिगारेट जप्त केल्या आहेत. प्रतिबंधीत विदेशी सिगारेटीचा लाखो रुपयाचा माल पोलिसांनी मुंबई घाटकोपर (पश्चिम) येथून हस्तगत केला असून तरुणास अटक करुन कार्यवाही केलेली आहे.

तपासणीदरम्यान टॉप गन या प्रतिबंधित विदेशी सिगारेट साठा आढळला. आरोपीताने विदेशी / ई




सिगारेट भारत सरकारने प्रतिबंधित परदेशी बनावटीची /ई सिगारेट बेकायदेशीरपणे वितरणासाठी जवळ बाळगला व इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध (उत्पादन निर्मिती आयात निर्यात वाहतूक विक्री वितरण साठा आणि जाहिरात) कायदा 2019 चे उल्लंघन केले म्हणून गु र क्र 721/2024 कलम 3.4 7 इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट उत्पादन निर्मिती आयात निर्यात वाहतूक विक्री वितरण साठा आणि जाहिरात प्रतिबंधक कायदा 2019 नुसार मुंबई पोलीसांनी कारवाइ करुन गुन्हा नोंदविला आहे.

# शालेय लेझीम स्पर्धेत चोगले हायस्कूलला विजेतेपद

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व क्रीडा विभागाअंतर्गत उपनगरीय शालेय लेझीम स्पर्धेत बोरिवली येथील चोगले हायस्कूलला विजेतेपद प्राप्त झाले आहे. शाळेने विजेतेपदाची परंपरा यंदाही कायम राखली आहे.

बोरिवलीच्या श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळाच्या मैदानात अलीकडेच झालेल्या या स्पर्धेत एकूण १३ शाळांनी सहभाग घेऊन मराठमोळी परंपरा असणारी ही वैभवशाली कला सादर केली. लेझीम खेळाचे तज्ञ शिक्षक रवींद्र पवार आणि दत्ताराम भोंडे यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. उपनगरातील विद्यार्थी, शिक्षक, कला-क्रीडाप्रेमी यांनी एकच गर्दी केली होती. चुरशीच्या या लढतीतून आर पूर्व विभागातून चोगले हायस्कूलचे लेझीम पथक आता जिल्हा स्तरावर पोहोचले आहे.

अन्य दोन विजेता संघात द्वितीय क्रमांक गोपाळजी हेमराज हायस्कूल आणि तृतीय क्रमांक विद्या प्रसारक मंडळ शाळा व सेंट जॉन्स हायस्कूल यांना विभागून देण्यात आले. चोगले हायस्कूलच्या लेझीम पथकाच्या सादरीकरणाचे कौतुक सर्वत्र होत आहे. शिक्षण व क्रीडा विभाग तसेच जवाहर बाल भवन यांच्या पदाधिकाऱ्यांनी चोगलेच्या पथकाचे अभिनंदन केले.

श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह संजय डहाळे यांनी "अस्सल शिवकाळातली परंपरा असलेल्या आणि मराठी बाणा जपणाऱ्या या खेळाला राज्य सरकार तसेच शाळा, कॉलेज, क्रीडा संस्था यांनी उत्तेजन दिले पाहिजे" ही अपेक्षा व्यक्त करून विजेत्या व सहभागी संस्थांचे यावेळी अभिनंदन केले आहे. मुख्याध्यापिका शरयू माने आणि क्रीडा शिक्षक डी.डी. पवार यांनी यावेळी खेळाचे महत्त्व व वैशिष्ट्ये सांगितली.

# डेन्मार्कसाठीच्या बहुउद्देशीय कार्गो व्हेसेल (एमपीव्ही)चा प्लेट कटिंग समारंभ संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडच्या एक नवरत्न DPSU, ने मंगळवारी डेन्मार्कच्या नवी मर्चंट्ससाठी पहिल्या बहुउद्देशीय मालवाहू जहाज (MPV) साठी उत्पादन प्रक्रियेला सुरुवात केली . श्रीसायमन क्रिस्टेनसेन, सीईओ, नवी मर्चंट्स प्लेट कटिंग समारंभासाठी प्रमुख पाहुणे होते. सायमन आणि संजीव सिंघल, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक MDL यांनी एकत्रितपणे संचालक (जहाज बांधणी), CVO MDL आणि MDL मधील इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पहिल्या स्टील प्लेटच्या कटिंगला सुरुवात केली.

माझगाव डॉकने 7500 DWT क्षमतेच्या एकूण 6+ (4 पर्यायी) जहाजांची रचना, बांधणी आणि वितरण करण्यासाठी नवी मर्चंट्स, डेन्मार्कसोबत करार केला आहे. या प्रकल्पाची किंमत 86.05 दशलक्ष USD (सुमारे 700 कोटी रुपये) आहे. प्रत्येक जहाजामध्ये एक



हायब्रिड प्रोपल्शन ड्राइव्ह असेल, जो उत्सर्जनाच्या कडक मानकांची पूर्तता करण्यासाठी बांधला जाईल आणि DNV (Det Norske Veritas) अंतर्गत वर्गीकृत केला जाईल.जहाजांची रचना आइस क्लास 1B प्रमाणे केली जाईल, ती सिंगल स्क्रू, कंट्रोलेबल पिच, मध्यम-स्पीड डिझेल इंजिनसह सुसज्ज असेल आणि अनिर्बंध जागतिक ऑपरेशन्ससाठी DNV क्लास नोटेशन बॅटरी (सुरक्षा) चे पालन करण्यासाठी इलेक्ट्रिकल एनर्जी स्टोरेज सिस्टमचा समावेश असेल.

ही अष्टपैलू जहाजे ड्राय बल्क, प्रोजेक्ट कार्गो, कंटेनर, स्टील उत्पादने, सामान्य कार्गो (पॅकेज केलेले, पॅलेटाइज्ड आणि बॅग केलेल्या वस्तूंसह), वन उत्पादने आणि धोकादायक माल यासह मोठ्या प्रमाणात मालवाहतूक करण्यास सक्षम असतील. पहिले जहाज एप्रिल 2026 मध्ये वितरणासाठी नियोजित आहे. मंगळवारचा प्लेट कटिंग समारंभ या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी उत्पादन क्रियाकलापांची अधिकृत सुरुवात दर्शवितो.

**NOTICE**

NOTICE is hereby given that the share certificate no. 01 for 5 (five) ordinary shares bearing Distinctive no. 1 to 5 of JAIRAJRATNA CHS LTD standing in the names of DAMODAR SAMBHAJI ROKADE EXPIRED DATED 25/06/2000 DC. NO. D-2020:27-90276-001196 have been reported lost and that an application for issue of Duplicate Certificate in respect thereof has been made to the society at BLDG NO 12, B -203 JAIRAJ RATNA CHS, NEW SHASTRI NAGAR, GOREGAON (W.), MUMBAI – 400 104., to whom objection if any, against issuance of such Duplicate Share Certificate should be made within 14 days from the date of publication of this notice. Share certificate is not mortgaged nor any loan taken against the flat.

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given that my client **MRS. NAYANA NITIN SHAH & MR. NITIN NATWARLAL SHAH**, Residing at Flat No. C/503, Magnum CHS Ltd., Viva Gokul complex, Bolinj, Virar (West), Pin–401303, have filed Police Complaint at Virar Police Station bearing No. 30636-2024 dated 24.09.2024 in connection of Lost/ Misplaced of Agreement for Sale dated 15/08/1985, Registration No. 1389/85 dated 02/09/1985 between M/s. Vrindavan Builders and Shri. Hemant Keshavlal Solanki.

Any person having any objection in connection of the above said Agreement for Sale, the same may be made known to me in writing within 7 days from the date of issue of this notice, failing which my client shall proceed further.

**Place: Virar**
**Date: 25.09.2024**

**(Dhanashri D. Yerunkar)**
**Advocate**

**Add: Shop No. 23, SHREE VRINDAVAN CHS LTD., 284 Agashi Rd, Behind Woodland Cinema, Virar (West), Dist-Palghar PIN 401303. Mobile No. 7249286502**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 95
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ९५
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

*मुंबई : कुर्ला नेहरू नगर विधानसभा क्षेत्रातील शिवसेना आमदार मंगेश कुडाळकर यांच्या उपस्थितीत सकल धनगर समाजाच्या वतीने आयोजित भव्य सत्कार समारंभ रविवारी कुर्ल्यात पार पडला. याप्रसंगी उपस्थितानी धनगरी गजी नृत्य, धनगरी ओवी व धनगरी कैफियत सारख्या कला प्रदर्शनामुळे धनगर संस्कृतीचा सुंदर आस्वाद घेतला. दरम्यान धनगर समाजाच्या वतीने आमदार मंगेश कुडाळकर यांचा सत्कार देखील करण्यात आला. यावेळी शिवसेना उपविभाग प्रमुख चंद्रकांत वसंत बनगर आदिसह मोठ्या संख्येने धनगर समाज आणि शिवसैनिक उपस्थित होते.*




# देशाचे संविधान व लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी येचुरींनी आयुष्यभर लढा दिला - नाना पटोले

## महाविकास आघाडीची माकपा नेते सिताराम येचुरींना आदरांजली

प्रतिनिधी
■ मुंबई

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सिताराम येचुरी यांनी देशाचे संविधान व लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी आयुष्यभर लढा दिला. देशातील समविचारी पक्षांना एकत्र आणण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. २००४ साली युपीए सरकार स्थापन करण्यात त्यांनीही पुढाकार घेतला होता तसेच २०२४ साली इंडिया आघाडी स्थापन करण्यातही त्यांचे मोठे योगदान होते. ते अत्यंत अभ्यासू तसेच सामान्य जनतेसाठी लढणारे नेते होते. राज्यसभेचे सदस्य असताना त्यांनी सातत्याने तळागाळातील लोकांचे प्रश्न संसदेत मांडले, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले.




यशवंतराव चव्हाण सेंटर येथे माकपा नेते सिताराम येचुरी यांना महाविकास आघाडीच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार, शेकापचे नेते जयंत पाटील, माजी खासदार कुमार केतकर, हुसेन दलवाई, महात्मा गांधीजींचे पणतू तुषार गांधी, पॉलिट ब्युरो सदस्य अशोक ढवळे, सुभाष लांडे, शाम गोहिल, किशोर ढमाले, प्रकाश रेड्डी, प्रा. सुरेश नवले यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

नाना पटोले पुढे म्हणाले की, सिताराम येचुरी हे आमचे महाविद्यालयीन काळातले आदर्श होते. विद्यार्थी चळवळीपासून काम करत त्यांनी पक्षाच्या सरचिटणीस पदापर्यंत विविध पदे भूषवली. युपीए सरकारवेळी सर्व पक्षांना एकत्र ठेवण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. मोदी सरकारच्या धोरणांनाही त्यांनी कडाडून विरोध केला. सिताराम येचुरी यांच्या निधनाने फक्त मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचेच नुकसान झालेले नाही तर देशाचे नुकसान झाले आहे, अशी आदरांजली पटोले यांनी वाहिली.

**_प्रागतिक विचार वाढवणे हीच येचुरींना श्रद्धांजली -पवार_**

*यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार म्हणाले की, सिताराम येचुरी यांचा अतिशय हुशार व्यक्तीमत्व असा लौकिक होता, विद्यार्थी चळवळीत त्यांचे मोठे योगदान होते. जवाहरलाल नेहरु विद्यापीठात त्यांनी नेतृत्वाची एक फळी निर्माण केली. आंतरराष्ट्रीय पातळीवरचा त्यांचा अभ्यासही दांडगा होता. डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखाली युपीए सरकार असताना आघाडी एकजूट ठेवण्यासाठी सिताराम येचुरी यांनी परिकाष्ठा केली. सिताराम येचुरी हे सभ्य व सुसंस्कृत व्यक्तीमत्व होते. प्रागतिक विचार वाढवणे हीच सिताराम येचुरी यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे शरद पवार म्हणाले.*

# वस्त्रोद्योगाला चालना देऊन रोजगार निर्मितीवर भर द्यावा - मुख्यमंत्री शिंदे

प्रतिनिधी
■ मुंबई

वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी 'ई-टेक्सटाईल' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या 'ई-टेक्सटाईल' प्रणालीचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले. यावेळी वस्त्रोद्योगमंत्री चंद्रकांत पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, वस्त्रोद्योग विभागाचे सचिव विरेंद्र सिंह व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे. या अंतर्गत लघु वस्त्रोद्योगाला चालना देऊन या माध्यमातून अधिक रोजगार निर्मिती करावी अशा सूचना शिंदे यांनी यावेळी दिल्या.

'ई-टेक्सटाईल' प्रणालीचे अनावरण



वस्त्रोद्योग विभागाच्या विविध योजनांकरिता एण्ड टू एण्ड प्रोसेस ॲटोमेशन करण्यासाठी ही प्रणाली नव्याने तयार करण्यात आली आहे. सहज व सुलभ व्यवसायाच्या माध्यमातून वस्त्रोद्योग विभागातील सर्व योजनांची माहिती एकत्रित उपलब्ध व्हावी आणि यामध्ये अधिक सुलभता यावी यासाठी आयसीआयसीआय बँकेमार्फत 'ई-टेक्सटाईल' प्रणाली विकसित करण्यात आली आहे, अशी माहिती वस्त्रोद्योग विभागाचे सचिव सिंह यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून दिली. याप्रसंगी वस्त्रोद्योग विभागाचे उप सचिव श्रीकृष्ण पवार, आयसीआयसीआय बँकेचे अधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# भारतरत्न लता मंगेशकर यांच्या जन्मदिनी गोरेगाव पूर्व येथे शनिवारी सांगीतिक कार्यक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतरत्न, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या जन्मदिवसा निमित्ताने त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी व सांगीतिक वारसा पुढे नेण्यासाठी शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी संगीत रसिकांसाठी एक अनोख्या आणि भावपूर्ण सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गोरेगाव पूर्व येथील नेस्को सेंटर, सभागृह क्रमांक ६ मध्ये सायंकाळी ६.३० ते रात्री १० वाजेपर्यंत रसिकांना स्वर - सुरांची पर्वणी अनुभवता येईल. दिवंगत लता मंगेशकरांच्या भगिनी तथा सुप्रसिद्ध गायिका उषा मंगेशकर यांनी लतादीदींच्या स्मरणार्थ श्रद्धांजलीपर असा हा सांगीतिक कार्यक्रम आयोजित केला आहे.

पद्मश्री सुरेश वाडकर, पद्मश्री अनुप जलोटा, पद्मश्री हरीहरन, तलत अजीज, शब्बीर कुमार, डॉ. सलील कुलकर्णी, शाहीद रफी, शैलेंद्र सिंह यांसारखे दिग्गज कलाकार यावेळी सादरीकरण करणार आहेत. प्रसिद्ध गायिका महालक्ष्मी अय्यर, वैशाली सामंत, बेला सुलाखे, अनन्या वाडकर, राजश्री बाग यांचा देखील सहभाग असणार आहे. उषा मंगेशकर यादेखील दोन गाणी गाणार आहेत.

हॅपीलकी एंटरटेनमेंटच्या संजय यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम सादर केला जाणार आहे. कार्यक्रमाचे निवेदन रेडिओ जॉकी (आर. जे.) गौरव आणि समीरा गुजर करतील. वाद्यवृंदाचे संचालन नितीन शंकर, तर संगीत संचालन योगेश प्रधान यांच्या हाती असेल. कार्यक्रमाचे संगणक निर्देशन मिहिर महाले करणार आहेत. ह्या कार्यक्रमाचे सुत्रधार आणि निर्देशक संजय हे आहेत. लता मंगेशकर यांच्यावरील प्रेम आणि आदर व्यक्त करण्यासाठी या सांगीतिक कार्यक्रमात सर्व संगीत प्रेमींनी आणि चाहत्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन उषा मंगेशकर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# सीएसएमटी लोहमार्ग पोलिसांनी अवघ्या 5 तासांत अल्पवयीन मुलगी शोधली

## अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या महिलेस साथीदारांसह अटक

दादासाहेब येंधे
■ मुंबई

सुफिया शारुख मुल्ला ही महिला २४ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजेदरम्यान त्यांचा मुलगा अरहान, (वय,३ वर्षे) व लहान मुलगी सोफिया (नाव बदललेले), वय १० महिने यांच्यासह सीएसएमटी मेनलाईन रेल्वे स्टेशन मेनलाईन हॉल मधील तिकीट काऊंटरच्या समोर झोपल्या असताना अज्ञात व्यक्तीने तक्रारदार यांच्या झोपेचा फायदा घेवून त्यांच्या दहा महिन्यांच्या मुलीस, त्यांचे संमतीशिवाय पळवून नेलेबाबत सीएसएमटी रेल्वे पोलीस ठाणेत , गु रजि.नं. ८२५/२०२४, कलम १३७(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.




सदर गुन्ह्याच्या तपासात सीएसएमटी रेल्वे स्टेशन येथील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली असता, एक संशयीत महिला व तिचा साथीदार असे त्या अल्पवयीन मुलीस घेवून पनवेलला जाणारी स्लो लोकल पकडून निघून जाताना सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसून आले. त्यानुसार सीएसएमटी रेल्वे पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी तपास पथके तयार करून रेल्वे हद्दीतील व शहर हद्दीतील सीसीटीव्ही फुटेजचा सतत मागोवा घेतला असता आरोपी महिला व तिचा साथीदार हे जे. जे. रोड, जे. जे. हॉस्पीटल गेट नं. ०८, नूरबाग जंक्शन, परिजात हॉटेल, बोहरी मोहल्ला, भेंडी बाजार जंक्शन, मोहम्मद अली रोड ते पायधुनी परिसर असे चालताना दिसून आले.

पायधुनी परिसरात स्थानिक रहिवाशी यांच्याकडे तपास करून अल्पवयीन दहा महिने वयाच्या मुलीचे अपहरण करणाऱ्या महिलेचा व तिच्या साथीदाराचा शोध घेवून त्यांना शिताफीने अटक केली. मध्य परिमंडळ, लोहमार्ग मुंबई चे पोलीस उपयुक्त मनोज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सीएसमटी लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे व त्यांच्या पथकाने सदरचा गुन्हा हा अथक परिश्रम घेऊन पाच तासांच्या आत उघडकीस आणला आहे. तरी सर्व महिला रेल्वे प्रवाशांना आवाहन करण्यात येते की, महिला प्रवाशांनी रेल्वे प्रवासात त्यांच्या सोबत असलेल्या लहान मुलांकडे विशेष-लक्ष द्यावे. त्यांना एकटे सोडून जावू नये अथवा त्यांना नजरेआड जावू देऊ नये.

# काम नीट जमत नसेल तर घरी बसा!

## एसआरए अधिकाऱ्यांना हायकोर्टाने फटकारले

### कांजूर गावातील पात्र कुटुंबांचे दोन वर्षांत सर्वेक्षण केले नाही

प्रतिनिधी
■ मुंबई

भांडुप पश्चिमेकडील कांजूर गावातील एसआरए प्रकल्पासाठी पात्र कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यास दिरंगाई करणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणावर (एसआरए) उच्च न्यायालयाने ताशेरे ओढले. कर्तव्य नीट पार पाडता येत नसेल, तर कार्यालयातून निघून जा, घरी बसा असा सज्जड दम न्यायालयाने एसआरएच्या अधिकाऱ्यांना दिला.

मूळ जागामालकाकडून २०१७ मध्ये जागा खरेदी केलेल्या विकासक 'युव्हीके कन्स्ट्रक्शन'ने अवमान याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. उच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२२ मध्ये प्रकल्पांतर्गत पात्र कुटुंबांचे सहा महिन्यांत सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशाला दोन वर्षे उलटत आली तरी एसआरएच्या अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण केलेले नाही. मार्चमध्ये सर्वेक्षण करण्याचा प्रयत्न केला होता. झोपडीधारकांनी तो हाणून पाडला. त्यावेळी पुरेसे पोलीस संरक्षण नव्हते, असे एसआरएच्या वकील सिमंतिनी मोहिते यांनी सांगितले. त्यावर खंडपीठ संतप्त झाले. अनेक प्रकरणांत अशीच साचेबद्ध उत्तरे दिली जातात. या प्रकरणात कोर्टाच्या आदेशानंतरही सर्वेक्षण का केले नाही, याची ठोस कारणे आम्हाला हवी आहेत. तसेच जबाबदार अधिकाऱ्यांची नावे नमूद करीत सविस्तर प्रतिज्ञापत्र १० ऑक्टोबरपर्यंत दाखल करा, असे सक्त आदेश खंडपीठाने एसआरएला दिले. याप्रकरणी १७ ऑक्टोबरला पुढील सुनावणी होणार आहे. न्यायालयाने एसआरएला कांजूर गावातील पात्र झोपडीधारकांचे चार आठवड्यांत सर्वेक्षण पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच हे सर्वेक्षण करण्यासाठी एसआरएला आवश्यक ते पोलीस संरक्षण पुरवण्यात यावे, असे आदेश भांडुपच्या पोलीस उपायुक्तांना दिले. एसआरएसारख्या प्राधिकारणांकडून न्यायालयीन आदेशांचे वारंवार उल्लंघन केले जात आहे.आम्ही या प्रकारांना चाप लावणार आहोत, असा इशारा खंडपीठाने सुनावणीवेळी दिला.

# राज्यातील अन्यायग्रस्त आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर

प्रतिनिधी
■ मुंबई

मोटार वाहन विभाग (RTO) कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेने गेल्या दोन वर्षापासून सातत्यपूर्ण पाठपुरावा करुन संगमाने परिवाहन आयुक्त प्रशासनाकडून सकारात्मक व कर्मचारीभिमुख कार्यवाहीची अपेक्षा बाळगली. परंतु गतीशील व कृतीशील अपेक्षित कार्यवाही नसल्यामुळे संघटना

कार्यकारिणीच्या निर्णयानुसार काल २४.०९.२०२४ पासून कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. महाराष्ट्रातील कर्मचारी असंतोषाच्या पार्श्वभूमीवर बेमुदत संपाच्या पहिल्या दिवशी १०० टक्के कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. संघटनेने लोकशाही व सनदशीर मार्गाचा अवलंब संप केला आहे असे संघटनेचे म्हणणे आहे.

**कर्मचाऱ्यांच्या या आहेत प्रलंबित मागण्या**

(१) आकृतीपंच मंजूर होऊन २ वर्षांचा कालावधी उलटला आहे. तरारोही अद्याप प्रशासनामार्फत अंमलबजावणीकेलेली नाही. आकृतीबंधाची अंमलबजावणी तत्काळ करण्यात यावी.

(२) ज्येष्ठता गमावून महसूल विभागनिहाय स्तरावर बदल्या केल्यामुळे कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला आहे. सदर अन्याय दूर करण्यात यावा.

(३) दि. १६/०८/२०२४ रोजीच्या कर्मचारी समायोजन आदेशाबाबत संघटनेने सादर केलेल्या पुनर्विचार करण्यात यावा.

(४) कामकाजात सूसूत्रीकरण आणण्यासाठी कळसकर समितीचा अहवाल अद्याप लागू केलेला नाही. सदर अहवालातील शिफारशी सत्वर लागू करण्यात याव्यात.पन्नास कार्यालयांमध्ये वेगवेगळ्या त-हेने कामकाज केले जात आहे, त्यामुळे कर्मचाऱ्यांना आणि विशेषत:जनतेला नाहक त्रास होत आहे.

(५) बदल्यांसाठी पात्र असलेल्या मुंबई विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत सहीत किंवा त्यांच्या मोल कार्यभारात सुध्दा बदल होत नाही, यायाबाबत मुंबई विभागातील कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी कमालीची नाराजी व्यक्त केली आहे. याबाबत सत्वर योग्य कार्यवाही अपेक्षित आहे.

आदी अनेक मागण्यांकरिता टप्याटप्याने आंदोलन केली होती. पण या मागण्यांकडे अक्षम्य दिरंगाई आणि दुर्लक्ष केल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे.सदर संपामुळे शासनाचे जवळपास दररोज ५० कोटींचे नुकसान संभवते. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक निर्णय घेतल्यास शासनावर आर्थिक कोणताही भार पडणार नाही.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड - ४१० २०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२ - २७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४० ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ५३ (ई-निविदा) सन २०२३-२४ ( फेर निविदा क्र. १)

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे ( दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी- १ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.
टिप - या निविदेमध्ये एकूण २ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन | दिनांक २०.०९.२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक २७.०९.२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर | उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा. क्र. / सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :-
डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी३२८५

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

# शुक्रवारी प्रभादेवी, करीरोडया भागात पाणी बंद

**मुंबई:** तानसा (पूर्व) १,४५० मिलीमीटर व्यासाच्या प्रमुख जलवाहिनीच्या दुरुस्तीमुळे गुरुवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री १० वाजेपासून शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत जी दक्षिण आणि जी उत्तर विभागातील काही भागांचा पाणीपुरवठा राहणार बंद राहणार आहे.१. जी दक्षिण- करी रोड, सखाराम बाळा पवार मार्ग, महादेव पालव मार्ग, लोअर परळ, डिलाईल मार्ग, बी. डी. डी. चाळ ( दैनंदिन पाणीपुरवठ्याची वेळ – पहाटे ४.३० ते सकाळी ७.४५ वा.) पाणीपुरवठा बंद राहील.जी दक्षिण– एन. एम. जोशी मार्ग, बी. डी. डी. चाळ (दैनंदिन पाणीपुरवठ्याची वेळ – दुपारी २.३० ते दुपारी ३.०० वा.) पाणीपुरवठा बंद राहील. जी दक्षिण– संपूर्ण प्रभादेवी, आदर्श नगर, पी. बाळू मार्ग, हातिसकर मार्ग, मराठे मार्ग, पांडुरंग बुधकर मार्ग, सेनापती बापट मार्ग, एन. एम. जोशी मार्ग, गणपतराव कदम मार्ग (दैनंदिन पाणीपुरवठ्याची वेळ – दुपारी ४.०० ते सायंकाळी ७.०० वा.) अंशतः (३३ टक्के) पाणीपुरवठा बंद राहील.

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई**
**( महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक )**
म्हाडा MHADA

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२१८७७८५
ईमेल - rreeamhada@gmail.com

**ई - निविदा**

कार्यकारी अभियंता अ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, कुलाबा संक्रमण शिबिर, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०००০५ यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता मुंबई यहर जिल्हातील डीडीआर वर्गासह योग्य वर्गाच्या अंतर्गत म्हाडा येथे नोंदणीकृत कामगार सहकारी संस्थेच्या विभागातर्फे इमारतीच्या दुरुस्तीच्या कामासाठी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ मधील नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी-१ (टक्केवारी दर) नमुन्यातील शतमान तत्वावर ई- निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | इमारत दुरुस्ती क्रमांक | निविदा ठेवलेली रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग | निविदा शुल्क (विना परतावा) | कामाची करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संक्रमण शिबिर कफ परेड, मुंबई इमारतीतील विशेष दुरुस्ती अंतर्गत आणि बाहेरील प्लॅस्टर, पेंटिंग व हेनेजचे काम करणे. | २६,१५,०००/- | ०.०० | २७०००.० (५०% FDR स्वरुपात व ५०% देयकातून) | वर्ग -अ | रु.५९०.०० | १८ महिने (पावसाळासह) |

| अ.क्र. | स्टेज | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | जाहिरात दिनांक | २५.०९.२०२४ |
| २ | निविदा विक्री सुरुवात दिनांक (ऑनलाईन) | २५.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून |
| ३ | निविदा विक्री बंद दिनांक (ऑनलाईन) | ०२.१०.२०२४ सध्यांकाळी ५.३० पर्यंत |
| ४ | निविदा स्विकृती सुरुवात दिनांक (ऑनलाईन) | २५.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून |
| ५ | निविदा स्विकृती अंतिम दिनांक (ऑनलाईन) | ०२.१०.२०२४ सध्यांकाळी ५.३५ पर्यंत |
| ६ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०४.१०.२०२४ सकाळी ११.०० पासून |
| ७ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | ०४.१०.२०२४ दुपारी १२.०० पासून |

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाई(ई-निविदा) दोन लिफाफे पध्दतीची असेल. निविदेसंबंधी सुचना, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाची संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द होईल.
२. निविदा संबंधित दस्तऐवज अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावर पाहून डाऊनलोड/अपलोड करता येईल, तसेच निविदा फार्म दिनांक २५.०९.२०२४ (सकाळी १०.०५ वाजूपासून) ते दिनांक ०२.१०.२०२४ (सध्यांकाळी ५.४५ पर्यंत) संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल.
३. वरील निविदेचे निविदा शुल्क व इसारा रक्कम ऑनलाईन पध्वतीने भरावे लागेल.
४. तांत्रिक निविदा दिनांक ०४.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून कार्यकारी अभियंता अ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, कुलाबा संक्रमण शिबिर, कफ परेड, कुलाबा, मुंबई यांचे दालनात संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर उघडण्यात येईल.
५. निविदाकाराने निविदा सादर करताना अपलोड केलेली सर्व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी तांत्रिक निविदा उघडण्याच्या वेळी सादर करावीत.
६. निविदाकाराने सादर केलेली माहिती व स्कॅन केलेल्या प्रती .pdf फॉरमॅट मध्ये तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावी.
७. निविदाकाराचे डीजीटल हस्ताक्षर हे वर्ग २/३ असावे.
८. कार्यकारी अभियंता अ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, यांचेकडे (निविदा स्विकृती अधिका-यांकडे) निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राहिल.
९. निविदा जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधणकारक आहे.
१०.निविदाकारास निविदासंबंधीची संपूर्ण माहिती संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावरुन मिळवावी.
११. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराणे काम करण्यास तयार असेल तर त्यांची निविदा मंजुर केली जाईल अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर सुचना पाहावी.

CPRO/A/731
Follow us: @mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/-
कार्यकारी अभियंता अ-विभाग,
मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई

# डायमंड उद्यानातील साहित्याची दुरुस्ती सुरु

**मुंबई:** चेंबूर येथील एन. जी. आचार्य (डायमंड) उद्यान सुशोभीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. याचा नाहक त्रास उद्यानात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे. निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी ज्येष्ठ नागरिकांनी केली आहे. पालिकेकडून या उद्यानाचे सुशोभीकरण करण्यात आले होते, मात्र सहा ते आठ महिन्यांतच या उद्यानात लावण्यात आलेल्या लाद्या उखडल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, हात पाय धुण्याची जागा बंद आहे. बसण्यासाठी बाके सुस्थितीत नाहीत. व्यायामाचे साहित्य जीर्ण झाले आहे. झाडांची देखभाल करण्यात येत नाही. लहान छतांऐवजी मोठे छत लावण्यात यावे, अशी मागणी कित्येकदा करण्यात आली होती, मात्र पालिका अधिकारी व स्थानिक प्रतिनिधी यांच्याकडून फक्त आश्वासन देण्यात येत होती.

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com
जा.क्र. पमपा / जनसंपर्क./३१२४/प्र.क्र. ४७३/४७५/२०२४ दिनांक :- २४/०९/२०२४

**ई- निविदा सुचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब - १ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदनीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.


| अ क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडुन) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पमपा/ विद्युत / ०४/ २०२४ | पनवेल महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी सौर उर्जेवर आधारीत पथदिवे बसविणे. (DPDC Schem) | रु.२,५८,२९,६२०/- | रु.१,२९,१४८/- | रु.१,१८०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनेवल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

**जा.क्र./पमपा/विद्युत/५५२३/प्र.क्र.०२ / ९४३ /२०२४**
**दिनांक- /०९/२०२४**

**Sd/-**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

जर तुम्ही स्वप्न बघु शकता तर नक्कीच तुम्ही ती पुर्ण करु शकता.



- जिग जिगलर
अमेरिकन लेखक

वृत्तमानस
मुंबई, बुधवार, २५ सप्टेंबर २०२४

# लोकांना आता 'सब्र का फल' नकोय...

सब्र का फल मीठा होता है, अशी एक म्हण आहे. आजवर या म्हणीचा लोकांकडून सर्रासपणे सकारात्मक बाबींसाठी वापर केला जात आहे. परंतु आत्ताच्या दिवसांमध्ये ही म्हण मागे पडते की काय असे वाटू लागले आहे. त्याला कारणही तसेच आहे. लोकांना आता कोणताही फळासाठी बिलकुल सब्र करायचा नाहीये कारण त्यांना त्यांच्या कामाचे फळ तात्काळ हवे अशी विचारसरणी आता सर्वत्र पसरू लागली आहे. या म्हणीला धरून लोकांना आता तात्काळ निकाल सुद्धा लागावा असे वाटू लागले आहे. अर्थात याला कारण ही काहीसे असेच आहे. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांवर नजर टाकल्यास लोकांना तात्काळ निकालाची अपेक्षा आहे. न्यायालयात अशी अनेक प्रकरणे आहेत की त्या प्रकरणांना चाळीस वर्षांचा कालावधी उलटून जाऊही ती अजूनही निकालाच्या प्रतीक्षा आहेत. चाळीस वर्षानंतर जर एखाद्या प्रकरणात निकाल लागत असेल आणि पीडिताच्य बाजूने तो लागला असेल तर त्याला निकाल म्हणता येईल का? असा प्रश्न लोकांच्या मनामध्ये उभा राहतो आहे अर्थात त्याचा हा प्रश्न देखील रास्त आहे. असाच प्रकार कालच्या शिंदे एन्काऊंटर प्रकरणाने समोर आला आहे. बदलापूर येथील एका नामांकित शाळेमध्ये लहान मुलींवर लैंगिक अत्याचार करणारा या नराधमाचा ठाणे गुन्हे पोलिसांनी एन्काऊंटर करून त्याला त्याच्या गुन्ह्याची शिक्षा तात्काळ दिली. कायद्याच्या भाषेत या घटनेला अनाधिकृत मानणारा देखील वर्ग आहे आणि कायद्यात राहून वर्षानुवर्षे हे प्रकरण सुरू राहण्याला, संतापलेला आणि तात्काळ निकालाची प्रतीक्षा असलेला वर्ग सुद्धा आहे. कालच्या एन्काऊंटर प्रकरणाने दुसरा वर्ग समाधानी झाला आहे. एखाद्या आरोपीचा गुन्हा पोलीस कस्टडीत असतानाच त्याच्याकडून कबूलला जात असेल, पोलीस पंचनाम्यात आढळलेले पुरावे सत्य असतील तर त्याला त्या प्रकरणात तात्काळ निकाल लागायला काय अडचण आहे असा प्रश्न जनतेच्या मनात पडलेला आढळतो. काल पोलिसांनी केलेल्या शिंदे एन्काऊंटर मध्ये देखील लोकांना हा निकाल समाधान देणारा वाटला. एखाद्या प्रकरणांमध्ये आरोपीचा गुन्हा सर्व समक्ष घडलेला असतानाही त्याला न्यायालयीन यंत्रणेचा आधार घेत वकिलामार्फत विविध तारखा घेऊन त्याला यावरील सुनावली लांबवता येते. अनेकदा निकाल देखील बदलला जाऊ शकतो. म्हणूनच लोकांना चुकीच्या माध्यमातून का असेना परंतु आता झटपट निकाल लागलेला पाहायचा आहे. काल शिंदे प्रकरणामध्ये ज्या पद्धतीने लोकांनी जल्लोष साजरा केला, फटाके वाजवले, पेढे वाटले यावरून तरी हेच दिसून येते. या प्रकरणावरून विरोधक देखील बाजूला पडलेले दिसतात. विरोधकांच्या पद्धतीने शिंदे एन्काऊंटरला अनैतिक मानले गेले. त्यावर संशय व्यक्त केला गेल. त्याला देखील लोकांमधून सुप्त विरोध होताना दिसला. याचा अर्थ विरोधक कायद्याने वागा असे सांगत असतील तर ते चुकीचे नाही परंतु बहुतांश लोकांना जर हे पटत नसेल तर लोकांना आता गुन्हा घडल्या घडल्या त्याला त्याच्या गुन्ह्याची शिक्षा झालेली पाहायची आहे. ती या प्रकरणावरून दिसून आली. पोलिसांनी ज्या पद्धतीने शिंदेचा एन्काऊंटर केला त्यामधून लोकांनी विरोधकांना जास्त प्रतिसाद दिला नाही. महिना भरपुर्वी बदलापूर येथील शाळेत घडलेला हा अमानुष प्रकार देशभरात चर्चेला जात आहे. सामान्य लोकांकडून त्यावर संताप व्यक्त केला जात आहे. या देशभरातील लोकांना न्यायालयीन प्रक्रियेवर म्हणावा तसा विश्वास राहिलेला नसल्याने ठाणे पोलिसांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल तो काही समाधानी झाला आहे. सुरुवातीला याच पोलिसांनी केलेल्या अक्षम्य दुर्लक्षच्या बाबतीमध्ये देशभरातील जनता संतापलेली होती. परंतु पोलिसांनी हा एन्काऊंटर करून जनतेला काहीसा दिलासा दिला आहे. त्यामुळे महिन्याभरापूर्वी संत प्रेरिता आता पोलिसांवर खुश आहे. आज भारतासारख्या देशामध्ये सर्व ठिकाणी महिला आणि अल्पवयीनांवरील लैंगिक अत्याचार वाढले आहेत. अल्पवयीनांना आणि दुर्बल महिलांना बळी पडावे लागत आहे. अशा नराधमांना तात्काळ कठोर शिक्षा मिळण्याऐवजी विविध पक्षातील नेतृत्व त्यांना पक्षात सामील करून घेते, निवडणुकीसाठी तिकीट देते आणि निवडूनही आणते. पक्षाच्या तिकिटावर निवडून आल्यानंतर सरकारी परवाना मिळाल्यागत आणखीन जोमाने अत्याचार करायला लागतो. यावेळी त्याला सरकारी पाठवून मिळत असल्याने तो आणखी राक्षस बनतो. समाजातील विविध मजबूर मुलींचे शोषण करणे त्याचा धंदा बनतो. त्याच्या या धंद्याला त्याच्या अनुयायांचेही पाठवा मिळत असत. हे सर्व सामान्य जनता डोळयाने पाहत असतानाही काहीच करू शकत नसल्यामुळे तो राग तसाच पोटात ठेवून राहते. त्यानंतर पोलिसांकडून शिंदे सारखे एन्काऊंटर घडले तर मग जनतेच्या पोटातील हा राग बाहेर येऊन पोलिसांचे गुणगान गायला लागतो. ठाणे पोलिसांनी सुरुवातीला या प्रकरणांमध्ये दाखवलेली हायगय चिड आणणारी होती. त्यामुळेच चिडलेली जनता रस्त्यावर उतरली होती. रस्त्यावर उतरलेल्या जनतेच्या रोशाला पोलिसांना सामोरे जावे लागले होते. सत्तेवर असलेल्या सरकारलाही या रावसाचा सामना करावा लागला होता. विरोधकांना या प्रकरणाच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरण्यासाठी कोलीत मिळाले होते. मात्र ठाणे पोलिसांनी जीवावर उदार होऊन केलेली ही कारवाई आता सगळ्यांना न्याय देणारी ठरणार आहे. बदलापूरमध्ये शिशु वर्गात शिकणाऱ्या दोन चिमुकल्या मुलींवर शाळेतच अत्याचार झाला. शाळेत कर्मचारी असलेला अक्षय शिंदे याला पोलिसांनी २४ तासांच्या आत अटक केली. मात्र या घटनेचे तीव्र पडसाद शहरात उमटले आणि २० ऑगस्ट रोजी शाळा परिसर तसेच रेल्वे स्टेशन मध्ये १० तास रेल रोको आंदोलन झाले. शेवटी या प्रकरणाची गंभीर दखल सरकारने घेतली व फास्ट ट्रॅक कोर्टात हा खटला चालविण्याचे काम सुरु करण्यात आले. खटला सुरु असलेल्या कल्याण न्यायालयमध्ये एका विशिष्ठ रूममध्ये पीडित तीन आठवड्यांपूर्वी मुलींसमोर आरोपीची ओळख परेड पार पडली. विशेष म्हणजे नॉन रिफ्लेक्टेड काचेच्या माध्यमातून ही ओळख परेड झाल्याने पीडित मुलगी आरोपीला पाहू शकत होती, मात्र आरोपीला पीडित मुलगी दिसत नव्हती. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ओळख परेड दरम्यान पुरेपूर दक्षता घेण्यात आली होती. याप्रकरणी विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले असून अक्षय शिंदे पोलिसांकडे असलेली बंदूक हिसकावत होता तोपर्यंत पोलिस काय करत होते? अक्षय शिंदेच खरंच एन्काऊंटर झालं का? असे सवाल उपस्थित केले जात आहेत. विशेष म्हणजे शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी या प्रकरणी संशय उपस्थित करुन कसून तपास करण्याची मागणी केली आहे. विरोधक अथवा इतर यंत्रणांकडून असे पोलिसांबाबत कितीही सवाल संशोध संशय उपस्थित केले जात असले तरी ज्या आरोपीचा एन्काऊंटर झाला आहे त्याच्याबाबत लोकांमध्ये बिलकुल सहानुभूती नसून पोलिसांनी केलेल्या कृत्याचे लोकांकडून समर्थनच केले जात आहे.

# 'प्रधानमंत्री पीक विमा योजना' – शेतकऱ्यांना आधार




नैसर्गिक आपदांमुळे शेती क्षेत्रातअनेक अडचणी निर्माण होतात. अवेळी पाऊस, ओला दुष्काळ, पिकांवर पडणारे विविध प्रकारचे रोग आदींमुळे शेतकऱ्याला हाती आलेले पिक मिळू शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागते. या सर्व गोष्टींचा विचार करून पिकासाठी विमा काढण्याचा निर्णय शासनाने घेतला. या पिक विम्याचा लाभ राज्यातील शेतकऱ्यांना होत आहे. पूर्वी शेतकऱ्यांना पिक विम्याच्या हप्त्याची रक्कम द्यावी लागत होती. मात्र, आता तर राज्य शासनाने एक रुपयात पीक विमा शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे राज्यातील बळीराजाला मोठा आधार मिळाला आहे.

पिकांच्या नुकसानीच्या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राहण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत विमा हप्त्याच्या 2 टक्के / नगदी पिकांसाठी 5 टक्के रक्कम शेतकऱ्यांनी भरण्याची तरतूद आहे. विमा हप्त्याचा भारही शेतकऱ्यांवर न ठेवता त्यांच्या हिश्श्याचा विमा हप्ता भरुन शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरुन पीक विमा पोर्टलवर नोंदणी करण्याची सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाने सर्व समावेशक पीक विमा योजना खरीप 2023 पासून राबविण्यास मान्यता दिली आहे.

**खरीप हंगाम २०२३ मध्ये ९६ लाख ४४ हजार शेतकऱ्यांना लाभ**

खरीप हंगाम 2023 मध्ये राज्यातील १ कोटी ७१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत नोंदणी केली होती. या योजनेअंतर्गत ९६ लाख ४४ हजार शेतकऱ्यांना ५ हजार २६१ कोटी ०५ लाख रुपये विमा रक्कम अदा करण्यात आली आहे. खरीप 2024 साठी भात, ज्वारी, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, भुईमूग, तीळ, कारळे, कांदा ही 14 पिके विमा योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत.

**योजनेची उद्दिष्ट्ये**

नैसर्गिक आपत्ती, किड आणि रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे. पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे. शेतकऱ्यांना नाविन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे. कृषि क्षेत्रासाठीच्या पत पुरवठयात सातत्य राखणे, जेणेकरुन उत्पादनातील जोखमींपासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबरच अन्नसुरक्षा, पिकांचे विविधीकरण आणि कृषिक्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ हे हेतू साध्य होण्यास मदत होईल.

**खरीप व रब्बी हंगामाकरिता जोखीम बाबी :**

हवामान घटकांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांची पेरणी किंवा लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान ( Prevented Sowing / Planting / Germination) हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान ( Mid Season Adversity) पिक पेरणीपासून काढणीपर्यतच्या कालावधीत नैसर्गिक आग, वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, पूर, क्षेत्र जलमय होणे, भुस्खलन, दुष्काळ, पावसातील खंड, किड व रोग इत्यादी बाबींमुळे उत्पन्नात येणारी घट (Yield Base Claim) स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे होणारे नुकसान (Localized Calamities) नैसर्गिक कारणांमुळे पिकांचे होणारे काढणीपश्चात नुकसान (Post Harvest Losses).

**समाविष्ट पिके : (14 पिके) (खरीप हंगाम)**

**तृणधान्य : भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका.**

**कडधान्य : तूर, मुग, उडीद.**

**गळित धान्य : भुईमुग, सोयाबीन, तीळ, कारळे.**

**नगदी पिके : कापूस व कांदा.**

**समाविष्ट पिके : (06 पिके) (रब्बी हंगाम)**

**तृणधान्य व कडधान्य : उन्हाळी भात, गहू (बागायत), रब्बी ज्वारी ( बागायत व जिरायत ), हरभरा.**

**गळित धान्य: उन्हाळी भुईमुग,**

**नगदी पिके: रब्बी कांदा.**

**सहभागी शेतकरी :**

अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजना ऐच्छिक राहील.

**जोखीमस्तर : सर्व पिकांसाठी 70 टक्के जोखीमस्तर आहे.**

**विमा हप्ता व अनुदान :**

शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी विमा संरक्षित रक्कमेच्या 2 टक्के, रब्बी हंगामासाठी 1.5 टक्के व नगदी पिकांसाठी 5 टक्के असा किंवा वास्तवदर्शी दर यापैकी जो कमी असेल तो राहील. केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनेनूसार केंद्र शासन कोरडवाहू जिल्ह्यातील पिकांना 30 टक्के व बागायती जिल्ह्यातील पिकांना 25 टक्केच्या मर्यादेत त्यांचा समप्रमाणातील हिस्सा अदा करणार आहे.

**विमा संरक्षित रक्कम :**

कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी पिकनिहाय विमा संरक्षण हे पिकनिहाय प्रति हेक्टरी मंजूर कर्ज मर्यादेपर्यंत देय राहील.

- दत्तात्रय कोकरे,
वरिष्ठ सहायक संचालक

## पत्र मानस

### केजरीवाल यांच्या प्रश्नाने दिल्लीचे राजकारण कोणते वळण घेणार?

आम आदमी पक्षाचे संयोजक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान मोदींना ७५ व्या वर्षी निवृत्ती का नाही ? असा सवाल करुन भाजपा आणि संघावर निशाणा साधला आहे. नुकताच दिल्लीतील जंतर मंतरवर आयोजीत "जनता की अदालत" कार्यक्रमात असे वक्तव्य केल्याचे वृत्त वाचनात आले. १७ सप्टेंबर रोजी पीएम मोदींनी वयाची ७४ वर्षे पूर्ण करुन ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याने केजरीवाल यांनी असे वक्तव्य केले असावे. लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, कलराज मिश्रा यांच्यासारखे पक्षाचे ज्येष्ठ नेते ७५ व्या वर्षात निवृत्त झाले आहेत मग मोदींना हा नियम का लागू होत नाही. अशी त्यांनी विचारणा केली आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांनी या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे. अशा शब्दांत केजरीवाल यांनी भाजपासह आरएसएस लाही धारेवर धरले आहे. मोदींनी प्रलोभने आणि ईडी सारख्या तपास यंत्रणा वापरुन अनेक पक्ष नेस्तनाबूत केले आहेत तर अनेक भ्रष्ट नेत्यांना आपल्या पक्षात सामावून घेतले आहे अनेक राज्यांतील सरकारे पाडली आहेत असा गंभीर आरोप देखील त्यांनी केला आहे. असला प्रकार भारतीय लोकशाहीसाठी घातक असून यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गप्प का ? याचा अर्थ त्यांना हा सर्व कारभार मान्य आहे का ? यासारखे मुद्दे उपस्थित करुन कमाल केली आहे नुकताच तिहार तुरुंगातून जामिनावर बाहेर आल्यावर केजरीवाल यांनी पीएम् मोदींवर अशी तोफ डागली आहे त्यामुळे आगामी काळात दिल्लीचे राजकारण कोणते वळण घेते ते पाहणे मोठे औत्सूक्याचे ठरणा आहे !

**- राजू जाधव, मांगूर, जि.बेळगांव**

### पीडित मुलींना न्याय मिळाला का?

आरोपी अक्षय शिंदेला फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे होती. बदलापूर येथे दोन चिमुरड्यांवर झालेल्या अन्यायाच्या या घटनेतील मुख्य आरोपीचा गुन्हा सिध्द होऊन शिक्षा झाल्यानंतर पोलीसी कारवाई मारला जायला हवा होता. आरोपीवर गुन्हा नोंदवताना चालढकल का झाली? बदलापूर प्रकरणातील संस्थाचालक फरार का आहेत? त्यांना अटक करुन त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई का झाली नाही? संस्थाचालक राजकीय पक्षाशी निगडित असल्याने त्यांच्यावर कार्यवाही झाली नाही का? शाळेतील १५ दिवसांचे सीसीटीव्ही फुटेज गायब करण्यात आले आहे.पोलिसांच्या कारवाईच्या निमित्ताने कायद्याची संपूर्ण प्रक्रियाच बायपास करण्याचा जो प्रयत्न झाला त्यातून अनेक गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत.या प्रकरणातील पुरावे नष्ट करण्यात आले आहेत. पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासारखी परिस्थिती का निर्माण झाली आहे? शाळेच्या संबंधित संस्थाचालक आणि या गुन्ह्यांत सामील असलेल्या इतर व्यक्तींनाही कडक शासन होईल तेव्हाच पीडित मुलींना न्याय मिळेल.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### पाच दशकानंतरही तीच परिस्थिती

साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'चित्रे आणि चरित्रे' या पुस्तकातील 'यवतमाळचे साहित्य संमेलन' या लेखात पुढील उतारा वाचनात आला. 'महाराष्ट्र शासनात मराठी भाषेचा वापर करण्याचा वेग वाढवावा. आकाशवाणी- वरच्या मराठी बातम्या सदोष असतात, त्या सुधाराव्यात. दूरचित्रवाणी जेव्हा काही वाङ्मयीन कार्यक्रमाचे चित्रण करते, तेव्हा ते काम जाणत्या मराठी अधिकाऱ्याकडून व्हावे. असे काही महत्त्वाचे ठराव पसार झाले.' ४९ वे साहित्य संमेलन यवतमाळ येथे १९७३ साली झाले होते. त्या संमेलनात पास झालेला हा ठराव. ५० वर्षापूर्वीही मराठी भाषेबाबत जी स्थिती होती तीच परिस्थिती आजही आहे आणि अजूनही तसेच ठराव पास होत असतात हीच खरी मराठी भाषेबाबतची शोकांतिका आहे.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### पुनर्वसनामध्ये मालमत्ता कर माफ असावा

मुंबई मध्ये राहणाऱ्या, सर्व सामान्य रहिवाशांना पुनर्वसनामध्ये ५०० चौ. फुटाच्यावर घरे मिळत आहेत. या मध्ये वर्षानुवर्ष कष्ट, हाल अपेक्षा सोशीत असलेला मराठी माणूस आहे. कित्येक वर्ष संक्रमण शिबिरात राहत आहेत. पुनर्वसनामुळे नागरीकांचे राहणीमान सुधारणार आहे. हे खरे असले तरी, ५०० फुटा पेक्षा जास्त आकाराच्या जागेवर, आकारण्यात येणारा मालमत्ता कर, हा खूप जास्त असल्यामुळे (अभ्युदय नगर वसाहतीतील घरे ६३५ चौ फूट घरांचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले आहे. काही ठिकाणी ८०० चौ फूट पर्यंत घरे मिळणार आहेत) या नव्या घराच्या मालमत्ता करामुळे, मराठी माणूस नाईलाजाने विरार, कल्याण पर्यंत फेकला जाणार आहे. अशा प्रकारे लाखो भूमिपुत्रांना स्थलांतर कारवे लागणार असल्यामुळे, राज्य सरकारने मालमत्ता करावर फेर विचार करणे आवश्यक आहे. तत्पूर्वी ५०० ते ७०० चौ फूट पर्यंतच्या घरांना ६०% सवलत मिळावी. सदर मागणीचा ठराव, मुंबई महापालिका सभागृहात ६ जुलै २०१७ ला संमत केला आहे. त्याप्रमाणे राज्य सरकारात अधिनियम १८८८ च्या कलम १४० व १४० अ मधील सुधारणा कारणे अपेक्षित होते. परंतु राज्य सरकारने १० मार्च २०१९ रोजी राज्यपालान तर्फे अध्यादेश काढून मालमत्ता करात ५०० चौ फूट पर्यंत, सर्वसाधारण कर माफ करण्यात आला आहे. आता भूमिपुत्रा संबंधी, मुंबईचे मराठीपण, मराठी संस्कृति, मराठी अस्मिता टिकण्याकरिता सरकारने त्वरीत निर्णय घ्यावा.

**- विजय कदम, लोअर परळ**

### चकमकीतून थेट शिक्षेचा निकाल

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर परिसरातील एका शाळेत अल्पवयीन बालिकेवर शिपायाने केलेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी मोठे आंदोलन करून नराधम आरोपीस भर चौकात जाहीर फाशी द्या,आरोपीस आमच्या ताब्यात द्या अशी मागणी करण्यात आली होती.त्यात विरोधी पक्षांनी ही सरकारला धारेवर धरले होते.पण आता आरोपी अक्षय शिंदे यास तळोजा कारागृहातून ठाण्यात आणताना झालेल्या चकमकीत पोलिसांकडून नुकताच मारला गेला आहे. या प्रकारानंतर विरोधी पक्षांनी संशय व्यक्त करून चौकशीची मागणी केली आहे.ती रास्तच आहेच.परंतु आता आरोपीस न्यायालयाने निकाल देण्या पर्यंत वाट न पाहता पोलिसांनीच त्याला थेट शिक्षा देवून तात्काळ निकाल लावला आहे असेच म्हणावे लागेल.

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव**

### नराधमाचा पुळका नेमका कशासाठी?

कर्नाटकातील मुळचा असलेला बदलापूर ग्रामीणचा राहणारा आणि शाळेतील मुलींवर अत्याचार करणारा नराधम अक्षय शिंदे याचा पोलिसांच्या कडून एन्काऊंटर झाला आहे. या नराधमानी पोलिसांच्या वर हल्ला केला पण त्यानंतर त्याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूची बातमी आली आणि बदलापूरकरानी फटाके फोडून आनंद व समाधान व्यक्त केले. तर मनसे सारख्या राजकीय पक्षाने पोलिस प्रशासनाच्या कृत्याचे समर्थन करुन जखमी पोलिसांना आर्थिक मदत देखील केली. पण याउलट मविआ अर्थात इंडिया आघाडी यांच्या कडून विरोधी व अनपेक्षित प्रतिक्रिया आलेली आहे. मविआच्या नेत्यांनी थेट मृत्यू झालेल्या नराधमाच्या एन्काऊंटर वरच शंका म्हणजे पोलिसांच्या कृतीचे असमर्थन केलेले असून एकप्रकारे नराधम अक्षय शिंदेला न्याय मिळवून देण्यासाठी शासनावर टाकलेला दबाब आहे. त्यामुळेच राज्यात विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे का असा प्रश्न पडू लागला आहे. विरोधकाना बलत्कारी अक्षय शिंदे याचा इतका पुळका नेमका आताच का आणि कशासाठी आला असावा तेवढे जनतेला समजून सांगावे असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर,कुर्ला**

### हा पैसा अदानीचा तर नव्हे?

महायुतीचे सरकार सत्तेत आल्यानंतर जनतेची मने आणि मते जिंकण्यासाठी शिंदे-फडणवीस-अजित पवार या तिघानी अनेक योजना आणल्या.आपल्या आमदाराना भरघोस निधी दिला.लाडकी बहिण योजनेतून प्रत्येक महिलेला १५०० रुपये दिले,जनता काय मागेल ते सढळ हाताने देत आहेत. मनमानी कारभार सुरु आहे.राज्यावर ८ लाख हजार कोटीचे कर्ज असताना पैश्याची वारेमाप उधळपट्टी सुरु आहे.भारतीय लेखापरिक्षकानी महामंडळे तोट्यात असल्याचा अहवाल देऊनही काही महामंडळावर मंत्रिपद देऊ न शकलेल्या आमदारांची वर्णी लावण्याचा उद्योग सुरु आहे.यासाठी या सरकारकडे एवढा पैसा येतो कोठून? हा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे.आगामी विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी आणि लोकसभेत आलेल्या कटू पराभवाच्या धास्तीने पैसा उधळला जात आहे.उद्योगपती अदानीच्या घशात अनेक प्रकल्प,धारावी पुनर्वसन योजना घालण्याचा प्रयत्न सुरु आहे. आम्हाला शंका येते की अदानीला सर्व प्रकल्प बहाल करुन विकासकामासाठी त्याच्याकडून आगाऊ रक्कम घेऊन हे महायुती सरकार पैश्याची उधळपट्टी तर करत नाही ना ? तसा सरकार आणि अदानी मध्ये अलिखित करार तर झाला नसेल ना?

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

## चिरनेर जंगल सत्याग्रहातील स्मारकांच्या दुरवस्थेकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**उरण :** महात्मा गांधी यांनी १९३० मध्ये स्वातंत्र्यासाठी दिलेल्या कायदेभंग आंदोलनात ब्रिटिश सरकारच्या गोळीबारात येथील आठ स्वातंत्र्य सैनिकांनी हौतात्म्य पत्करले आहे. या हुतात्म्यांची स्मारके त्यांच्या मूळ गावी उभारण्यात आली आहेत. या स्मारकांची दुरवस्था झाली असून त्यांची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता आहे. मात्र याची जबाबदारी असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग व पंचायत समिती या दोन्ही विभागाकडून एकमेकांकडे जबाबदारी ढकलली जात आहे. २५ सप्टेंबर १९३० ला उरणच्या चिरनेर जंगलात ब्रिटिश सरकारचा कायदा मोडीत सत्याग्रहात आठ जणांनी हौतात्म्य पत्करले. स्वातंत्र्य लढ्यातील सुवर्णपान असलेल्या या हुतात्म्यांच्या स्मृती तेवत ठेवण्यासाठी सरकारने १९८० च्या दशकात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून उभारण्यात आली आहेत. यामध्ये धाकू गवत्या फोफेरकर (चिरनेर)आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे) परशुराम रामा पाटील (पाणदिवे) रामा बामा कोळी (मोठी जुई) खोपटे व पाणदिवे या मूळ गावी हुतात्मा स्मारके उभारली आहेत.



### म ह त्वा चे

### पाणी पुरवठा विषयी जाहीर आवाहन

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेचे भोकरपाडा जलशुध्दीकरण केंद्र व मोरबे धरण ते दिघा मुख्य जलवाहिनीवर देखभाल दुरुस्तीची व इतर कामे करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने गुरुवार दिनांक 26/09/2024 रोजी सकाळी 10.00 ते रात्री 8.00 वाजेपर्यंत भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र येथील पाणी पुरवठा 10 तास बंद ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे गुरुवार संध्याकाळी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आणि कामोठे व खारघर नोड मधील पाणी पुरवठा बंद राहील तसेच शुक्रवार दिनांक 27/09/2024 रोजी कमी दाबाने पाणी पुरवठा होईल. त्याअनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आणि कामोठे व खारघर नोड मधील नागरीकांना याव्दारे जाहीर आवाहन करण्यात येते की, या कालावधीत पाण्याचा जपून व काटकसरीने वापर करुन नवी मुंबई महानगरपालिकेस सहकार्य करावे.

### चालकांचे कामबंद आंदोलन

**ठाणे :** इलेक्ट्रिक बस चालविणाऱ्या काही चालकांचे पीएफ न भरल्याचे कारण देत बसचालकांनी कामबंद आंदोलन पुकारले होते. यावेळी कंत्राटदाराने त्या बसचालकांची समजूत काढून पीएफ भरल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले, त्यानंतर सुमारे तासाभरानंतर कामबंद आंदोलन मागे घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली..केंद्र सरकारच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा उपक्रमांतर्गत इलेक्ट्रिक बस टप्प्याटप्प्याने खरेदी केल्या आहेत. इलेक्ट्रिक बसचे चार्जिंग स्टेशन कोपरीतील कन्हैय्या नगर येथे उभारले आहे. तर, ठाणे परिवहन सेवेने बस चालविण्यासाठी ठेकेदाराची नियुक्ती केली आहे. त्या ठेकेदाराने बस चालविण्यासाठी ड्रायव्हर पुरविण्यासाठी नेमलेल्या संस्थेकडून काही बसचालकांचे पीएफचे पैसे भरले नसल्याचे कारण देत कामबंद आंदोलन पुकारले होते. याची दाखल घेत ठेकेदाराने तत्काळ संबंधित ठिकाणी धाव घेऊन चालकांचे म्हणणे ऐकून घेत पीएफबाबत माहिती दिली. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन मागे घेतले; मात्र या दरम्यान ज्या काही बस रद्द अथवा उशिराने धावल्या असतील. त्याची माहिती घेत दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती ठाणे परिवहन सेवेचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी दिली

### रायगडावरील जलसाठ्यांत वाढ

**महाड :** रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून किल्ले रायगडावर जतन व संवर्धनाची कामे करण्यात येत आहेत. तूयामुळे यंदा किल्ल्यावरील लहान- मोठे तलाव, टाके व जलसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. रायगडावरील तलाव तुडुंब भरल्याने शिवप्रेमींमधून समाधान व्यक्त होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जलविषयक धोरण किल्ले रायगडावर पाहायला मिळते. त्याकाळी किल्ल्यावर असणाऱ्या लोकवस्तीसाठी पुरेश्या पाणीसाठ्याचे महाराजांची नियोजन केले होते; परंतु शेकडो वर्षे किल्ल्यावरील तलावांची साफसफाई व स्वच्छता न झाल्याने गाळ, कचरा साचला होता. गंगासागर तलाव, फुटका तलाव, श्रीगोंदा तलाव व काळा हौद पूर्ण भरले आहेत.

# ज्या स्थानकात आंदोलन, तिथेच आनंदोत्सव

## अक्षय शिंदे चकमकीनंतर बदलापूर स्थानकात पेढे वाटप

**प्रतिनिधी**
**बदलापूर**

बदलापूर शहरातील नामांकित शाळेत झालेल्या चिमुकल्यांच्या अत्याचारानंतर २० ऑगस्ट रोजी ज्या बदलापूर स्थानकात तब्बल नऊ तास ऐतिहासिक असा रेल रोको झाला. त्या स्थानकात मंगळवारी सकाळी पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. सोमवारी मुंब्रा येथे या प्रकरणाचा मुख्य आरोपी अक्षय शिंदे याचा पोलीस चकमकीत मृत्यू झाला. त्यानंतर बदलापुरातील आंदोलकांनी आनंद व्यक्त केला होता. मंगळवारी सकाळी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने पेढे वाटप करण्यात आले.




बदलापुरातील चिमुकल्यांच्या अत्याचारानंतर संपूर्ण राज्यभरातून संताप व्यक्त होत होता. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात दिरंगाई केली. शाळा प्रशासनाने प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नागरिकांचा संताप वाढला होता. २० ऑगस्ट रोजी बदलापुरात उत्स्फूर्त आंदोलन झाले. मुंबईचे लाईफ लाईन असलेली लोकल सेवा तब्बल नऊ तास ठप्प होती. त्यामुळे हे प्रकरण संपूर्ण देशभर पसरले. त्याची सर्वांना दखल घ्यावी लागली. या आंदोलनानंतर राज्य सरकारने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन केली होती. तर उज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नेमणूक केली. हा खटला फास्ट ट्रॅकवर चालवण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. गेल्याच आठवड्यात या प्रकाराचा तपास पूर्ण होऊन आरोपी अक्षय शिंदे विरुद्ध आरोप पत्र न्यायालयात दाखल करण्यात आले होते. त्यावर सुनावणी सुरू होणार होती.

अक्षय शिंदेवर दाखल करण्यात आलेल्या तिसऱ्या गुन्ह्यात त्याचा ताबा घेण्याच्या वेळी मुंब्रा बायपास जवळ पोलिसांच्या चकमकीत अक्षय शिंदे यांचा मृत्यू झाला. त्यानंतर बदलापूर शहरात नागरिकांनी आनंद व्यक्त केला. काही ठिकाणी फटाके फोडले तर काही आंदोलकांनी एकमेकांना पेढे भरवत आनंद व्यक्त केला. मंगळवारी सकाळी ज्या बदलापूर रेल्वे स्थानकात तब्बल नऊ तास रेल रोको आंदोलन झाले होते. त्याच स्थानकात प्रवाशांनी एकमेकांना पेढे भरवले. शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख वामन म्हात्रे यांनी प्रवाशांना पेढे वाटप केले. मुलींच्या प्रकरणात आरोपींना फाशी व्हावी अशी सर्वांची मागणी होती. आरोपीने स्वतः मृत्यूचा मार्ग निवडला असे सांगत मात्र यांनी चिमुकल्यांना न्याय मिळाला अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

# ठाण्यात थकबाकीदारांच्या 611 नळजोडण्या खंडीत

## 30 मोटर पंप जप्त; सुमारे 33 कोटी रुपयांची पाणी देयकांची वसुली

**प्रतिनिधी**
**ठाणे**

ठाणे महापालिका क्षेत्रातील पाणी देयकांच्या थकबाकीदारांविरोधात प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून यामध्ये थकबाकीदारांच्या आतापर्यंत ६११ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. याशिवाय, ३० मोटर पंप जप्त करण्यात आले आहेत. या पाणी देयक वसुली अभियानात आतापर्यंत सुमारे ३३ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. या कारवाईमुळे थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत.

ठाणे महापालिकेच्या अर्थसंकल्पात विविध विभागांना कर वसुलीचे उद्दीष्ट ठरवून देण्यात येते. अशाचप्रकारे पाणी पुरवठा विभागाला पाणी देयक वसुलीचे उद्दीष्ट ठरवून देण्यात आलेले आहे. ठाणे महापालिकेची पाणी देयकाची रक्कम सुमारे २२४ कोटी रुपयांच्या घरात आहेत. त्यापैकी, ७६ कोटी रुपये ही थकबाकी आहे तर, १४८ कोटी रुपये ही चालू वर्षाच्या देयकांची रक्कम आहे. या देयकांच्या वसुलीवर पालिका प्रशासनाने लक्ष केंद्रीत केले असून त्यासाठी थकबाकीदारांविरोधात कारवाईचा बडगा उगारून नळजोडण्या खंडीत करण्याची कारवाई सुरू केली आहे. या संदर्भात ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी आदेश दिले आहेत. तसेच अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी देयकांच्या साप्ताहिक वसुलीचे लक्ष्य निर्धारित करून पाणी देयक वसुली अभियान सुरू करण्यास सांगितले होते. त्यानुसार, पाणी देयच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागात नळ जोडणी खंडीत करणे, मोटर पंप जप्त करणे, मीटर खोलीला टाळे लावण्यात येत आहे. तसेच, पाणी देयकाचा भरणा करण्याऐवजी खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा जोडून घेणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचीही कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली.



महापालिका क्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळ संयोजनाच्या थकीत देयकाची चालू वर्षाच्या मागणीसह पूर्ण भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट लागू करण्यात आली आहे. ही योजना १ सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत लागू राहील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती नळजोडणीधारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील. त्यांना ही सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही, असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

# पंतप्रधानांच्या उपस्थितीत होणार सूखोई विमानाची चाचणी

**नवी मुंबई**

नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील पहिल्या धावपट्टीवरील भारतीय विमानतळ प्राधिकरणातर्फे घेण्यात आलेली सिग्नल चाचणी व इन्स्ट्रुमेंट लॅंडिंग सिस्टीम चाचणी यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर पुढील १० दिवसात म्हणजेच ५ ऑक्टोबरला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीमध्ये हवाईदलाचे लढाऊ विमानाची (सूखोई) चाचणी विमानतळावर घेण्याच्या हालचालींना वेग आला आहे.



याबाबतची अधिकृत घोषणा मंगळवारी सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी सिडको भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. मंगळवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची मंगळवारी सिडकोचे अध्यक्ष शिरसाट यांनी पाहणी केली. यावेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल,सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, दिलीप ढोले, मुख्य व्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय प्रकल्प व विशेष प्रकल्प) शीला करुणाकरन, अदानी समुहाचे उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.

# एमआयएम कार्यकर्त्यांची पोलिसांसोबत झालेल्या झटापटीत पोलिसांचा लाठीचार्ज

## इम्तियाज जलील यांची तिरंगा रॅली ठाण्याहून परतताना घडली घटना

**प्रतिनिधी**
**ठाणे**

एमआयएम पक्षाचे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये झटापट झाल्याची घटना काल रात्री ठाणे शहरातील आनंद नगर जकात ब्लॉकजवळ घडली. एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांची तिरंगा रॅली माघारी फिरत असताना हा प्रकार घडला. कार्यकर्त्यांनी केलेल्या झटापटीनंतर पोलिसांनी लाठीचार्ज करून जमावाला पांगवले.



रामगिरी महाराजांनी पैगंबर मोहम्मद यांच्याबद्दल केलेले वादग्रस्त वक्तव्य आणि नितीश राणे यांच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर एमआयएमचे नेते माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शेकडो लोकांसह छत्रपती संभाजीनगर ते मुंबई अशी तिरंगा संविधान रॅली काढली. काल रात्री ही तिरंगा रॅली ठाण्यात पोहोचल्यानंतर भिवंडी, मुंब्रा या मुस्लिमबहुल भागातील कार्यकर्तेही रॅलीत सहभागी झाले. मात्र प्रशासनाने या कार्यकर्त्यांना आणि रॅलीला मुंबईत प्रवेश करण्याची परवानगी दिली नाही.

त्यानंतर इम्तियाज जलील यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. आम्ही आमचे म्हणणे सरकारपर्यंत पोहोचवले आहे. आता कारवाई झाली नाही तर जेलभरो आंदोलन करू, असा इशारा निवेदनातून देण्यात आला. यानंतर लोकांनाही माघारी फिरण्याची विनंती केली.

# बुध्द विहारासाठी किमान किंमतीत भुखंड द्या

## भारतीय बौध्द परिषदेची सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांच्याकडे मागणी

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

आखिल भारतीय बौध्द परिषदेच्या वतीने सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांना प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर ॲड हर्षल शाक्य, एच बी जाधव, नारायण वाघमारे. नरसिंग कांबळे, राजरत्न डोंगरगावकर, अक्षय कांबळे, अनिल मुळे यांनी आज भारताचे संविधान, माईलस्टोन भाषणे, शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. भेटीअंती शिष्टमंडळाने बौध्दांच्या सिडकोकडे असलेल्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन दिले. नवी मुंबईतील १४ नोड मध्ये बौध्द धार्मियांच्या धर्मदाय संस्थांना पायाभूत किंमत आकारून भूखंडाची मागणी केली. सर्व समाज घटकांना नैतिकता, अहिंसा, मैत्री, करूणा, शांतता, मानवतावाद, संविधानीक मुल्याचे संस्कार करणाऱ्या बुध्दाच्या शिकवणुकीला सिडकोकडून १४ पैकी ११ नोडमध्ये एकही भुखंड मागणी करुन दिला नाही असे निवेदनात नमुद केले आहे.

१९७० पासून सिडकोने नवी मुंबईतील 14 नोड्स विकसित केले आहेत, त्यात १) ऐरोली, २) घणसोली, ३)कोपारखैरणे, ४) वाशी, ५) सानपाडा, ६) नेरूळ, ७) सीबीडी बेलापूर, ८) खारघर, ९) कलंबोली, १०) कामोठे, ११) पनवेल, १२) उरण, १३) द्रोणागिरी १४) तळोजे विकसित करण्यात आले आहे. सर्व धर्मीयांचा सन्मान म्हणून सिडकोने बौध्द धर्माच्या लोकांना देणे आवश्यक होते. पण ते देण्यात आले नाही. त्याची पुर्तता गेल्या ५० वर्षात सिडकोने केली नाही असा आरोप डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी केला आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, सिडको क्षेत्रात जवळजवळ १५ लाख लोकसंख्या असून त्यामध्ये बौध्दांची १० टक्के लोकसंख्या आहे. नवी मुंबईतील बोध्दांच्या धर्मदाय संस्थाकडून २००७ पासून वारंवार मागणी असताना सुध्दा सिडको प्रशासनाकडून टोलवा टोलवीचे आणि टाळण्याचेच काम झाले आहे. असेही डोंगरगांवकर म्हणाले.

# घोडबंदर किल्ला आणि स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी 28 कोटी मंजूर

**प्रतिनिधी**
**भाईंदर**

मीरा -भाईंदर शहराला लाभलेल्या ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्यासाठी ८ कोटी आणि स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे कलादालन यांच्या सभोवतालचा परिसर सुशोभित व विकसित करण्यासाठी २० कोटी असा राज्य शासनाकडून मूलभूत सोयी सुविधांचा विकास या निधीच्या माध्यमातून सुशोभिकरण आणि घोडबंदर किल्ला संवर्धन करण्यासाठी एकूण २८ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



याबाबतची निविदा पालिकेने प्रसिध्द करण्यात आली असून त्यातून लवकरात कार्यादेश देण्यात येणार आहे.

ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याचे जतन व्हावे आणि घोडबंदर किल्ला परिसराचे सुशोभिकरण मार्गी लागावे म्हणून सातत्यपूर्ण प्रशासनाने राज्य सरकार आणि पुरातत्व विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला होता.

# सागरी किनारा रस्त्यासाठी हजारो झाडांचा बळी?

## बेलापूरमध्ये मानवी साखळी आंदोलन करत नागरिकांचा तीव्र विरोध

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

खारघर ते नेरूळ हा सागरी किनारा रस्ता तयार करण्याचे नियोजन सिडकोने केले आहे. त्याअंतर्गत पहिल्या टप्प्यात सिडकोने बेलापूर सेक्टर-१५ तसेच ११ परिसरातील नागरिकांनी लावलेल्या जवळजवळ ३० हजार झाडांवर कुऱ्हाड कोसळणार असल्याची शक्यता असून या परिसरात स्वत: लावलेल्या व निर्माण केलेल्या निसर्ग संपदेवर घाला घातला जाणार असल्यामुळे या परिसरातील नागरिकांनी मानवी साखळी करत सिडकोचा तीव्र निषेध केला. नियोजित खारघर ते नेरुळ सागरी किनारा मार्गाच्या विरोधात मुख्यमंत्री, सिडको अधिकारी यांची भेट घेणार असून वेळ पडल्यास न्यायालयाचाही दरवाजा ठोठावणार असल्याचा इशारा येथील नागरिकांनी दिला आहे.



सिडकोने याबाबत निविदा नोटीस प्रसिद्ध केली असून त्यासाठी निविदा मागवल्या आहेत. सिडकोने खारघर सेक्टर १६ जलमार्ग ते खारघर रेल्वेस्थानक येथून किल्ला गावठाण ते नेरुळ जेट्टीमार्गे निवासी भागापर्यंतचा रस्ता प्रस्तावित केला आहे. या सिडकोच्या सागरी किनारा मार्गाच्या निर्मितीमुळे २०१३ पासून बेलापूर सेक्टर ११, परिसरात १२ वर्ष लावलेल्या झाडांच्या मुळावर या कोस्टल रोडचे संकट ओढवले आहे. तत्कालिन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी याच बेलापूर सेक्टर १५ येथील परिसरातून 'वॉक विथ कमिशनर'उपक्रम सुरू करुन सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न आयुक्तांकडे थेट मांडण्याचा सुसंवाद सुरू केला होता. परंतु आता याच निसर्ग सौंदर्याने नटलेल्या सेक्टर १५ परिसरातील सौंदर्यावर गदा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बेलापूर सेक्टर ११ तसेच १५ परिसरात हजारो झाडे नागरिकांनी लावली,जोपासली आहेत. त्यामुळे या ३० हजार झाडांची निसर्ग संपदा व या विभागाचे सौंदर्य जपण्यासाठी रविवारी या विभागातील हजारो नागरिक रस्त्यावर उतरुन या सागरी किनारा मार्गाला विरोध केला आहे. सेक्टर १५ वॉकर्स फाऊंडेशनच्या माद्यामातून मानवी साखळी करत सिडकोच्या व शासनाचा भूमिकेचा निषेध केला.

# एपीएमसीच्या पाचही मार्केटमध्ये 4 हजारहून अधिक नागरिकांनी राबविले महास्वच्छता अभियान

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

आशियातील सर्वात मोठया एपीएमसी मार्केटमध्ये लोकसहभागातून नवी मुंबई महानगरपालिका आणि मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये नमुंमपा व एपीएमसी अधिकारी, कर्मचारी यांच्यासह लोकप्रतिनिधी, स्वच्छताकर्मी, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य, युवक, विद्यार्थी आणि स्वच्छताप्रेमी नागरिक यांनी 4 हजारहून अधिक मोठया संख्येने सहभागी होत हे भव्यतम अभियान यशस्वी केले.



यामध्ये विशेषत्वाने विविध महाविद्यालयांचे एनएसएसचे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याप्रमाणे एपीएमसी मार्केटमध्ये काम करणा-या माथाडी कामगारांनी ते ज्या मार्केटमध्ये काम करतात तेथील स्वच्छता मोहीमेत मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. नवी मुंबई महानगरपालिकेचे स्वच्छतामित्र तसेच एपीएमससी मार्केट्सचे स्वच्छताकर्मी यांनीही अभियान यशस्वी करण्यात योगदान दिले. विविध स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी व सदस्यही मोठ्या संख्येने या स्वच्छता मोहीमेत सक्रिय सहभागी झाले.

एपीएमसी मार्केट मधील कांदा बटाटा मार्केट येथे अभियानाचा शुभारंभ करताना महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांच्यासह उपस्थितांनी स्वच्छता व प्लास्टिकमुक्तीची सामुहिक शपथ ग्रहण करीत स्वच्छतेस प्रारंभ केला. भाजीपाला मार्केट, फळ बाजार, मसाला मार्केट, दाणा बाजार अशा पाचही मार्केटमध्ये सखोल स्वच्छता मोहीम व्यापक जनसहभागातून राबविण्यात आली.

17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2024 या कालावधीत संपूर्ण देशभरात 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा साजरा करण्यात येत असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेने व्यापक लोकसहभागावर भर देत दररोज विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियान अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबवितांना त्यामध्ये विद्यार्थी सहभागावर भर दिला जात आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून दुर्लक्षित स्थानांच्या सखोल स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जात असून संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाला अन्नधान्य, फळे व भाजीपाल्याचा दैनंदिन पुरवठा करणा-या एपीएमसी मार्केट्सच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याच्या भूमिकेतून आयुक्तांच्या संकल्पनेनुसार मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सहयोगाने पाचही बाजारपेठांमध्ये सखोल स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**वृक्ष प्राधिकरण**

**-जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (०१ जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ ( ३ ) (क) मधील तरतूदी नुसार परिमंडळ -३ मधील एच / पूर्व विभागातील ०१ प्रस्ताव, एच / प विभागातील ०४ प्रस्ताव आणि के / पूर्व विभागातील ०३ प्रस्ताव असे एकूण ०८ प्रस्तावास ८ (६) अन्वये मा. म. न. पा. आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुनर्रोपित करणेबाबत तपशील हा म.न.पा.च्या mcgm.gov.in ----> बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी ----> विभाग आणि खाते ----> खातेनिहाय माहिती पुस्तिका ----> उद्याने व वृक्ष प्राधिकरण----> कागदपत्रे----> वृक्षांची परवानगी २१ दिवस या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ----> ३३३ (एच / पूर्व), ३३४ (के / पूर्व), ३३५ (एच / प ), ३३६ (एच/प), ३३७ (एच/प), ३३८ (के / पूर्व), ३३९ (के / पूर्व ), ३४० (एच / प ) - परि. ३

**उद्यान अधिक्षक यांचे कार्यालय**

उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय,
वीरमाता जिजाबाई भोसले उदयान व प्राणिसंग्रहालय २ रा मजला, इम्बोल्ट पेग्विन कक्ष
संत सावता माळी मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई - ४०००२७.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२ Email - dysg.ta@mcgm.gov.in

सही/-
उद्यान अधीक्षक
व वृक्ष अधिकारी

पीआरओ/१३९०/जाही/२०२४-२५

गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.

## तुळजाभवानी देवीची मंचकी निद्रा सुरु

**तुळजापूर :** महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास ३ ऑक्टोबरपासून घटस्थापनेने प्रारंभ होणार आहे. त्यापूर्वी देवीच्या मंचकी निद्रेस मंगळवारी प्रारंभ झाला. तुळजाभवानी देवीच्या मंचकी निद्रेची तयारी मंगळवारी सकाळपासूनच सुरू होती. सुवासिनी महिलांनी एकमेकींना हळदी-कुंकू लावून देवीच्या गादीचा कापूस वेचून काढला. यावेळी आराधी मंडळाने आराधी गीत गायले. मुस्लिम समाजातील शेख कुटुंबियांनी कापूस पिंजून दिल्यानंतर निकते, कुलकर्णी कुटुंबियांनी तो नवीन कपड्याने तयार केलेल्या तीन गाद्यात भरला. इकडे देवीचे शेजघर, पलंग, खोली पलंगे कुटुंबियांनी घासून धुवून स्वच्छ केल्यानंतर चांदीच्या पलंगावर नवारपट्ट्या बांधण्यात आल्या. त्यावर तीन गाद्या व लोड ठेवण्यात आल्यानंतर पलंगपोस टाकून बाजुला मखमली पडदे लावण्यात आले. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास देवीचे शेजघर पलंगे कुटुंबियांनी तयार केले. साडेसहा वाजल्यानंतर देविजींना भाविकांचे दही, दूध पंचामृत अभिषेक करण्यात आला. देविजींची मूर्ती स्वच्छ करण्यात आली.



### महत्त्वाचे

## बँकेच्या महिला व्यवस्थापकाकडून 3 कोटींची चोरी

**पुणे :** पुण्यामध्ये बँकेच्या लॉकरमधील पावणे तीन कोटी रुपयांचे सोनं चोरीला गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बँकेच्या महिला व्यवस्थापकानेच हे सोनं चोरलं. पुण्यातील पंजाब नॅशनल बँकेमध्ये हा प्रकार घडला आहे. याप्रकरणी पुणे पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे. पुण्यात पंजाब नॅशनल बँकेच्या महिला व्यवस्थापकाने बँकेच्या लॉकरमधून तब्बल पावणे तीन कोटी रुपयांचे सोने चोरलं. नयना अजवानी असे सोनं चोरलेल्या पंजाब नॅशनल बँकेच्या महिला व्यवस्थापकाचे नाव आहे. पुण्यातील सोपान बाग परिसरात राहणाऱ्या पंजाब नॅशनल बँकेतील लॉकरमध्ये पावणेतीन कोटी रुपयांचे सोनं लॉकरमध्ये ठेवले होते. बँकेची महिला व्यवस्थापक नयना अजवानीने बँकेच्या लॉकरमधील सोनं चोरले. हे सोनं नयना अजवानी, सुरेंद्र शहानी यांनी चोरून ज्वेलर्स सतीश पंजाबी यांच्या दुकानात वितळवले पंजाब नॅशनल बँकेच्या व्यवस्थापिका नयना अजवानी, सुरेंद्र शहाणी आणि ज्वेलर सतीश पंजाबी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पुण्यात आयएमडीकडून रेड अलर्ट जारी

**पुणे :** भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) पुणे जिल्ह्यासाठी उद्या (25 सप्टेंबर) रेड अलर्ट जारी केला आहे. एका प्रसिद्धीमध्ये, आयएमडीने अंदाज वर्तवला आहे की जिल्ह्यात काही ठिकाणी गडगडाटी वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह अति मुसळधार पाऊस पडेल.26 आणि 27 सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या भूमिगत मेट्रो मार्गाच्या उद्घाटनासाठी तसेच स्वारगेट ते कात्रज या मार्गाचा विस्तार करण्यासाठी आणि पिंपरी ते उन्नत मार्गिकेच्या पायाभरणीसाठी पुण्यात येणार आहेत. -चिंचवड ते निगडी, आयएमडीने यलो अलर्ट जारी केला आहे. "मुसळधार ते खूप मुसळधार पाऊस आणि विजांच्या कडकडाटासह वादळ आणि वादळी वाऱ्यासह वेगळ्या ठिकाणी," रिलीझमध्ये म्हटले आहे.

## कोल्हापूर ते गुजरात विमानसेवा 27 ऑक्टोबरपासून

**कोल्हापूर :** कोल्हापूर आणि गुजरातचे व्यापारी संबंध असल्याने कोल्हापूरहून अहमदाबादला नियमितपणे ये-जा करणाऱ्या ग्राहकांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे २७ ऑक्टोबर पासून कोल्हापूर-अहमदाबाद गुजरात नियमित विमानसेवा सुरू होणार आहे. सोमवार, गुरूवार, शुक्रवार आणि शनिवारी ही सेवा सुरू राहणार असून कोल्हापूरहून सकाळी ११ वाजता विमान उड्डाण करेल आणि १२ वाजून २० मिनिटांनी अहमदाबादला पोहोचेल अशी माहिती खासदार धनंजय महाडिक यांनी मंगळवारी दिली.कोल्हापूरच्या विमानसेवेचा गतीने विस्तार होत असून कोल्हापूर- तिरूपती विमान सेवा सुरू झाली आहे. नागपूर, गोवा तसेच दिल्ली मार्गावर थेट विमानसेवा सुरू होण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. आता कोल्हापूरकरांची मागणी असलेली कोल्हापूर ते अहमदाबाद गुजरात थेट विमानसेवा २७ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे.

# पुणे महानगराच्या विकासाकडे विशेष लक्ष देणार!

## राज्यपालांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांना दिले आश्वासन

प्रतिनिधी
■ पुणे

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज आपल्या पुणे दौऱ्यात राजभवन येथे विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांशी जिल्ह्यातील विविध विकास विषयक प्रश्नांवर चर्चा केली. तसेच उद्योग, संस्कृती, कला, खेळ आदी घटकांशी संवाद साधून त्यांच्या विकास विषयक अपेक्षा, समस्या व संकल्पना जाणून घेतल्या.



राज्यपाल यांच्याशी चर्चा करण्यासाठी खासदार मेधा कुलकर्णी, श्रीरंग बारणे, आमदार माधुरी मिसाळ, आमदार संजय जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख आदी उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन यांच्या समोर प्रामुख्याने पुणे जिल्ह्यात सुरू असलेली आणि भविष्यात आवश्यक असलेली विकास कामे, पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुकीशी संबंधित बाबी, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करणे, कायदा व सुव्यवस्था आदी प्रमुख विषय मांडण्यात आले. तसेच उद्योग विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास, उद्योगांच्या समस्या, पर्यटन विकासासाठी सुविधांचा विकास यासारखे विषय मांडण्यात आले.

राज्यपाल राधाकृष्णन यांनी सर्व गटांचे म्हणणे ऐकून घेत सर्व मागण्या व विकास संकल्पनांबाबत लक्ष घालण्याबाबत आश्वस्त केले.

या संवाद चर्चेसाठी साहित्य, नाट्य, दिग्दर्शन, सामाजिक कार्य आदींशी संबंधित मान्यवर ज्यामध्ये सतीश देसाई, रामदास फुटाणे, मोहन कुलकर्णी, अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडू श्रीरंग इनामदार, शांताराम जाधव, ध्यानचंद पुरस्कार प्राप्त स्मीता शिरोळे, तृप्ती मुरगुंडे, ऑलिम्पिकपटू अंजली भागवत, मनोज पिंगळे, बाळकृष्ण आकोटकर आदी तसेच उद्योग व वाणिज्य संघटनांचे प्रमुख, जिल्ह्यातील प्रमुख उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# मराठी दिग्दर्शकाची अभिमानास्पद कामगिरी

## आशुतोष गोवारीकर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या अध्यक्षपदी

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

जगभरातील चित्रपटप्रेमींमध्ये मानाचा समजला जाणारा अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथे 15 ते 19 जानेवारी 2025 पर्यंत हा महोत्सव होणार असून अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या समितीनं या महोत्सवाची रुपरेषा सांगितली आहे. यात आशुतोष गोवारीकर यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.

या महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल आणि मुख्य संरक्षक अंकुशराव कदम यांच्या नेतृत्वाखालील आयोजन समितीने महोत्सवाची माहिती दिली. आयोजक समितीने चित्रपट महोत्सवाच्या आयोजनाबाबत सदस्यांची नावे जाहीर केली असून त्यात आशुतोष गोवारीकर आणि सुनील सुकथनकर या नामवंतांचा समावेश आहे. आशुतोष गोवारीकर यांनी लगान, स्वदेश, जोधा अकबर, पानिपत अशा ऑस्कर नामांकीत सिनेमांचं दिग्दर्शन केलं असून चित्रपट निर्मिती आणि दिग्दर्शनातील हे मोठे नाव आहे. भारातीय सिनेमा ऑस्करपर्यंत पोहोचवणारे हे प्रसिद्ध दिग्दर्शक निर्माते आहेत. मागील २५ ते ३० वर्षांपासून भारतीय सिनेमाचं जगभरात उल्लेखनीय नाव होण्यात गोवारीकरांचा मोठा सहभाग आहे. गोवारीकर यांनी आपल्या अभिनय, दिग्दर्शन व निर्मिती प्रक्रीयेने




भारतीय चित्रपटसृष्टीत मागील तीन दशकांपासून भक्कम योगदान दिले आहे. लेखक, दिग्दर्शक, निर्माता आणि अभिनेता म्हणून भारतीय चित्रपटसृष्टीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या आशुतोष गोवारीकर यांनी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्येही छाप सोडली आहे.

अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या अध्यक्षपदी आशुतोष गोवारीकर यांची निवड करण्यात आली असून महोत्सवाच्या संचालकपदी प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक सुनिल सुकथनकर यांची नेमणूक करण्यात आली आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते सुनील सुकथनकर हे देखील या आवृत्तीसाठी महोत्सव संचालक म्हणून काम पाहतील. माजी दिग्दर्शक अशोक राणे यांच्या जागी, ज्यांचा कार्यकाळ नुकताच संपला आहे. सुकथनकर यांनी गेल्या 30 वर्षांत मराठी चित्रपटसृष्टीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. नाथ ग्रुप, महात्मा गांधी मिशन व यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत व मराठावाडा आर्ट कल्चर व फिल्म फाऊंडेशनच्या वतीने मागील ९ वर्षांपासून अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे आयोजीत केला जातो.

## राज्यभरातील प्राथमिक शिक्षक आज आंदोलनासाठी रजेवर... शाळा राहणार बंद?

प्रतिनिधी
■ पुणे



कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये शिक्षकांची कंत्राटी नियुक्ती, विद्यार्थ्यांना गणवेश न मिळणे, अध्यापन सोडून करावी लागणारी प्रशासकीय कामे अशा विविध मुद्द्यांवर राज्यभरातील शिक्षक आज (२५ सप्टेंबर) रजा घेऊन आंदोलन करणार आहेत. त्या अंतर्गत शिक्षक संघटनातर्फे राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचे नियोजन करण्यात आले असून, त्यामुळे काही ठिकाणी शाळा बंद राहण्याची शक्यता आहे.

शालेय शिक्षण विभागाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील शालेय शिक्षणावर विपरित परिणाम होणार असल्याची शिक्षक संघटनांची भूमिका आहे. त्यामुळे शिक्षण विभागाच्या निर्णयांविरोधात प्राथमिक शिक्षकांची काही दिवसांपूर्वी पुण्यात बैठक झाली. त्यात शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांचा सहभाग असलेले व्हॉट्सॲप समूह सोडणे, काळी फीत लावून काम करणे अशाप्रकारे विरोध दर्शवण्यात आला. त्यानंतर आता रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला जाणार आहे.


कमी पटाच्या शाळांवर तात्पुरत्या शिक्षकांची नियुक्ती, पुढे त्या शिक्षकालाही काढून टाकल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबणार आहे. शाळा सुरू होऊन तीन महिन्यांनंतरही कित्येक विद्यार्थी गणवेशाविना आहेत.

# ब्रेक ऐवजी एक्सीलेटरवर पडला पाय, शिवशाही बसची 5 वाहनांना धडक

## दोन वाहनांचा झाला चुराडा

प्रतिनिधी
■ नाशिक

नाशिक त्र्यंबकरोड पिनॅकल मॉल जवळ शिवशाही बसने 4 ते 5 वाहनांना धडक दिली आहे. बस चालकाचा ब्रेकच्या जागी एक्सेलटर वर पाय पडला आणि ही दुर्घटना घडली आहे. सुदैवाने अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.मात्र वाहनांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. अपघातात दोन बाईक चक्काचुर झाला आहे. यात एक महिला गंभीर जखमी झाली आहे. घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, शिवशाही बस नाशिक त्र्यंबकरोड पिनॅकल मॉलजवळ आली असता बस चालकाने बसवर नियंत्रण मिळवण्यासाठी ब्रेक दाबण्याचा प्रयत्न केला.



मात्र चुकून ब्रेकऐवजी एक्सीलेटर पाय पडला आणि बसचा वेग अचानक वाढला. यात समोरच्या पाच वाहनांना बसची धडक बसली. तर दोन दुचाकी बसखाली आल्या. दुचाकी बससोबत फरफटत केल्या. सुदैवाने प्रसंगावधान राखत दुचाकीस्वार दुचाकीसोडून बाजूला झाल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र एक महिला गंभीर जखमी झाली आहे. नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळताच मुंबई नाका पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि बसखाली अडकेल्या दुचाकी बाहेर काढल्या. या घटनेचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

# महारॅली काढून आरक्षण वाचविण्यासाठी नागपुरातून एल्गार

प्रतिनिधी
■ नागपूर

'जाती तोडो - समाज जोडो'चा नारा देत आरक्षण बचाव महारॅलीला मंगळवारी नागपुरातून दणक्यात सुरुवात झाली. शहरातील सर्व विधानसभा मतदारसंघ फिरून शहरातील रॅलीची सांगता मेडिकल चौक येथे झाली. ही महारॅली बुधवारी मुंबईकडे रवाना होणार असून, ३ ऑक्टोबरला मंत्रालयावर धडक देणार आहे.

मंगळवारी सकाळी संविधान चौक येथून महारॅलीला सुरुवात झाली. कास्ट्राईब महासंघाचे अध्यक्ष अरुण गाडे तसेच माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप, प्रा. राहुल मून, प्रा. रमेश पिसे, प्रा. मधुकर उईके, मीना भागवतकर, नामा जाधव यांच्या



प्रमुख नेतृत्वात सुरू झालेली रॅली पश्चिम नागपूर, उत्तर नागपूर, मध्य, पूर्व, दक्षिण व दक्षिण-पश्चिम नागपूरच्या भागात फिरून रात्री मेडिकल चौक येथे तिचे समापन झाले. बुधवारी अण्णा भाऊ साठे चौक, दीक्षाभूमी येथून ही रॅली रवाना होणार असून, ३ ऑक्टोबरला आझाद मैदान, मुंबई येथे महारॅलीचा समारोप होणार आहे.


कास्ट्राईब महासंघ, संविधान परिवार, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन, भारतीय बौद्ध महासभा व इतर संघटना एकत्रित करून आरक्षण बचाव कृती समितीद्वारा आयोजित आरक्षण बचाव महारॅली काढण्यात आली आहे. राज्य सरकार ओबीसी, एससी/एसटी, भटके व विमुक्तांचे, आरक्षण बंद करण्याचे षड्यंत्र करीत असल्याचा आरोप महारॅलीतून करण्यात आला. पदोन्नतीतील आरक्षण तत्काळ लागू करावे, अनुसूचित जातींचे वर्गीकरण करण्यात येऊ नये, ओबीसी एस.सी. एस. टी.-व्हीजेएनटीसोबत भेदभाव बंद करावा. बार्टी, महाज्योती समाजकल्याण, आदिवासी विभागाचा निधी मुख्यमंत्री लाडली बहीण योजनेसाठी वापरू नये, सर्व मुलामुलींना मोफत व दर्जेदार शिक्षण मिळावे, शिष्यवृत्ती वेळेवर व महागाईच्या प्रमाणात देण्यात यावी, मागासवर्गीयांवरील अन्याय दूर करावा, या व इतर मागण्या या अभियानाच्या माध्यमातून करण्यात येत आहेत. राज्य शासनाच्या मागासवर्गीय धोरणाविरोधात नागपूर ते मुंबई मंत्रालय महारॅली काढण्यात आल्याचे अरुण गाडे यांनी यावेळी सांगितले.

# राजकोट किल्ल्यावरील पुन्हा शिवरायांचा पुतळा पून्हा राहणार उभा

## सरकारने काढली निविदा

प्रतिनिधी
■ मालवण

मालवणातील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हा महिन्याभरापूर्वी म्हणजेच 26 ऑगस्ट 2024 ला कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 04 डिसेंबर 2023 ला नौदल दिनानिमित्त या पुतळ्याचे उद्घाटन करण्यात आले होते. पण अवघ्या नऊ महिन्यात महाराजांचा 35 फुटी पुतळा कोसळल्याने राज्यातील सामाजिक आणि राजकीय वातावरण पेटले होते. पण या प्रकरणी आता महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने या किल्ल्यावर पुन्हा पुतळा उभारण्याचा निर्णय घेतला असून यासाठीची निविदा प्रक्रिया काढली आहे.



महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाने राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी 20 कोटींची निविदा काढली आहे. याबाबतची जाहीरात विविध वर्तमानपत्रांमध्ये देण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता कणकवली यांनी ही निविदा प्रक्रिया काढली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नव्या पुतळ्यासाठी सुमारे 20 कोटी अंदाजे खर्च गृहीत धरण्यात आला आहे. काम पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आलेली आहे. त्यामुळे इच्छूक शिल्पकारांना 03 ऑक्टोबरपर्यंत शिवाजी महाराजांच्या प्रस्तावित पुतळ्याचे 03 फूट उंचीचे फायबर मॉडेल सादर करावे लागेल. त्यानंतर 04 ऑक्टोबरला सर्वोत्कृष्ट मॉडेलची निवड होईल आणि राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बांधण्याच्या पुढील प्रक्रियेला सुरुवात होईल, अशी माहिती राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.

## आजपासून बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याचा प्रारंभ

प्रतिनिधी
■ नागपूर

रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक सरचिटणीस तसेच राज्यसभेचे माजी उपसभापती दिवंगत नेते बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याचा प्रारंभ रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) च्या वतीने आज होत आहे. आज बुधवार २५ सप्टेंबर रोजी दुपारी २-०० वा हिंदी मोरभवन, अर्पण सभागृहात,सिताबर्डी, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार उपेंद्र शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या ह्या सोहळ्याचे उद्घाटन चलो बुध्द ओर अभियानाचे प्रमुख एड शिवराज कोळीकर यांच्या हस्ते होणार आहे

याप्रसंगी पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस मा देशक गिरीशबाबू खोब्रागडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष मा डॉ गोपीचंद मेश्राम, राष्ट्रीय संघटक उत्तमराव गवई, राष्ट्रीय प्रवक्ते मा डॉ एन व्ही ढोके, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भाऊ निरभवणे, कार्याध्यक्ष डॉ देवेश कांबळे, उपाध्यक्ष सी एम रामटेके, सरचिटणीस जीवन बागडे,प्रा अशोक ढोले, विदर्भ प्रदेश अध्यक्ष मा सी पी रामटेके , पुर्व विदर्भ अध्यक्ष मा कर्नल सिंह दिघवा,पश्चिम विदर्भ अध्यक्ष सुरेश दहिकर, मुंबई प्रदेश अध्यक्ष भागवत कांबळे नागपूर प्रदेश अध्यक्ष राजू भाऊ गजभिये यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत अशी माहिती मुंबई प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी दिली आहे

# आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर

## विविध मागण्यांसाठी आरटीओ दालनासमोर निदर्शने




प्रतिनिधी
■ संभाजीनगर

राज्य मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन विभागातील सर्व 100% कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपात सहभाग घेतला. त्यामुळे संपाच्या पहिल्याच दिवशी वाहनांचे हस्तातंरण, कर्ज प्रकरणे, नोंदी, शुल्क वसुली आदी कामे पूर्णपणे ठप्प होती. कार्यालयीन कामाजाचा खोळंबा झाला होता. यामुळे वाहन चालक मालकांची प्रचंड गैरसोय झाली. तसेच ७० टक्के महसुल देखील बुडाला आहे.

आकृतीबंधाची अंमलबजावणी करा. आकृतीबंधानुसार तात्काळ पदोन्नती द्यावी. सेवा प्रवेशाची त्वरीत अंमलबजावणी करावी, जाचक अटी रद्द कराव्यात. समायोजन रद्द करावे. महसूली बदल्या रद्द कराव्यात. कळसकर समितीची सुधारीत अंमलबजावणी व्हावी. या प्रमुख मागण्यांसाठी राज्य मोटार वाहन विभागातील १६०० कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. सरकारकडे वारंवार मागणी करूनही मागण्यांची पूर्तता होत नाही. याचा निषेध नोंदवण्यासाठी आरटीओतील संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी आरटीओच्या दालनासमोरच निदर्शने आंदोलन देखील केले. आमच्या मागण्या मान्य करा, जाचक अटी रद्द करा, महसूल बदल्यांचा निर्णय मागे घ्यावा, अशा घोषणा संपातील कर्मचाऱ्यांनी देऊन सर्वांचे लक्ष वेधले.

# मंत्रीपदाची 'एक्सपायरी डेट'जवळ आलेल्या केसरकरांनी शिकवू नये!

## केसरकरांवर पारकरांचा हल्लाबोल

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

राजकीय नेता म्हणून काम करताना कोणाला मर्यादा नसते. अन्याय झालेल्या ठिकाणी मी नेहमीच पोहोचतो. त्या लोकांचे प्रश्न सोडवतो. ही माझ्या कामाची पद्धत आहे. त्यामुळे ज्यांच्या मंत्रीपदाची "एक्सपायरी डेट" जवळ आली. अशा मंत्री दीपक केसरकर यांनी आम्हाला शिकवू नये, असा टोला ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संदेश पारकर यांनी आज येथे लगावला.

दरम्यान सासोली प्रकरणात सेनेचे जिल्हाप्रमुख बाबुराव धुरी माझ्यासोबत नाहीत. हे त्याचे वैयक्तिक मत आहे. मात्र



माझ्यासोबत सर्व जनता आहे. उद्याच्या आंदोलनात आमची ताकद दाखवून देऊ, असे त्यांनी सांगितले. पारकर यांनी आज भूमि अभिलेखच्या अधिकाऱ्यांना घेराव घातला. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी दीपक केसरकर यांनी सासोली प्रकरणात बाहेरच्या व्यक्तींनी या ठिकाणी येऊनये, अशी पारकर यांच्यावर टीका केली होती. याला प्रत्दे ताना पारकर यांनी केसरकर यांच्यावर जोरदार टीका केली.

पारकर म्हणाले, केसरकर यांच्या मंत्रीपदाचे फक्त काही दिवस आता शिल्लक राहिले आहेत. त्यांच्या मंत्रीपदाची 'एक्सपायरी डेट' जवळ आली आहे. त्यामुळे त्यांनी मला शिकवू नये. ज्या ठिकाणी लोकांवर अन्याय होतो. त्या ठिकाणी मी नेहमीच जातो. टोल नाक्याचा प्रश्न असो वा घाट रस्त्याचा प्रश्न असो नेहमी मी लोकांसोबत राहिलो आहे. राजकीय नेता म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीला कुठे मर्यादा नसते. तो कुठेही जाऊन काम करू शकतो. तुम्ही सिंधुदुर्गातले आहात मुंबईचे पालक मंत्रीपद घेतलात. आता तुम्ही चाकरमान्याप्रमाणे सिंधुदुर्गात येतात म्हणजे तुम्ही बाहेरचे नव्हे का? असा सवाल उपस्थित केला. सासोली प्रकरणात केसरकर गेली अनेक महिने गप्प का? त्यांनी आतापर्यंत त्यांना न्याय का दिला नाही? असा सवाल त्यांनी केला. दरम्यान आजच्या आंदोलनात शिवसेनेचे स्थानिक कार्यकर्ते नाहीत. तसेच बाबुराव धुरी यांनी या आंदोलनाला आपला विरोध दर्शवला आहे. याबाबत श्री. पारकर यांना छेडले असता ते म्हणाले, माझ्यासोबत बाबुराव धुरी नसले तरी जनता आहे. मी शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नासाठी झटत आहे. त्यामुळे उद्याच्या आंदोलनात ताकद दाखवून देईन.

## मुंबईकर कैरोलिन फर्नांडिसला वर्ल्ड स्केट गेम्समध्ये कास्यपदक

**मुंबई :** मुंबईची प्रतिभावान खेळाडू कैरोलिन फर्नांडिस इटलीमध्ये झालेल्या वर्ल्ड स्केट गेम्स 2024 मध्ये रोलर डर्बी या स्पर्धेत ब्रॉझ मेडल पटकावून मुंबईचे नाव जागतिक पातळीवर उंचावलं आहे. तिची निवड रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित निवड प्रक्रिया द्वारे झाली होती. या स्पर्धेच्या तयारीसाठी तिने भारतातील तीन प्रशिक्षण शिबिरे - कोयमतुर, चंदीगड, आणि दिल्ली येथे हजेरी लावली होती. सप्टेंबर 18 ते 22 या कालावधीत झालेल्या या रोमांचक स्पर्धेत अमेरिकेने पहिल्या क्रमांकाचे सुवर्ण पदक पटकावले, तर ऑस्ट्रेलियाने रौप्य पदकावर कब्जा केला. भारताने तृतीय स्थान मिळवताना चीनसोबतचा सामना अत्यंत कडवी झुंज देऊन जिंकला. या यशामुळे क्रीडा कारकीर्द नवी उंची गाठली आहे, आणि ती मुंबईसाठी तसेच भारतासाठी अभिमानाची बाब आहे. तिचे कठोर परिश्रम, समर्पण, आणि जिद्दीमुळे हे यश साध्य झाले आहे. तिच्या या अपूर्व यशाबद्दल संपूर्ण मुंबई आणि भारतभरातून तिचे कौतुक होत आहे.यासाठी तिला पी के सिंग सरांचे मार्गदर्शन लाभले आहे.



## पालिका उपायुक्त (परिमंडळ-3) विश्वास मोटे यांनी पूर्ण केली 'आयर्नमॅन' स्पर्धा

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिका उप आयुक्त (परिमंडळ-३) आणि एम पश्चिम विभागाचे सहायक आयुक्त विश्वास मोटे यांनी इटली येथे दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडलेली 'आयर्नमॅन इटली एमिलिया रोमाग्ना' ही स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली. एड्रियाटिक समुद्रात पोहणे, दुचाकी चालवणे आणि धावणे अशा तीन अत्यंत आव्हानात्मक प्रकारांत ही स्पर्धा पार पडली.

विश्वास मोटे यांनी एकूण १५ तास २५ मिनिटे आणि ०४ सेकंदात या तीनही प्रकारांतील स्पर्धा पूर्ण करुन यश संपादन केले. या यशाबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून मोटे यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. मोटे यांनी यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये सहायक आयुक्त पदावर काम केले आहेत. तर,



सध्या ते उप आयुक्त (परिमंडळ-३) आणि सहायक आयुक्त (एम पश्चिम) या पदांवर कार्यरत आहेत. दैनंदिन कामकाज पार पाडून त्यांनी हे यश संपादीत केले असून ही बाब कौतुकास्पद आहे.

शारीरिक क्षमतेचा कस लागणारी खडतर अशी स्पर्धा म्हणून आयर्नमॅन स्पर्धा ओळखली जाते आणि खूप कमी लोक यात यशस्वी होतात.'आयर्नमॅन इटली एमिलिया रोमाग्ना' या स्पर्धेत जगभरातील विविध देशांतील २ हजार ४३९ स्पर्धक सहभागी झाले होते. तर, भारतातील २८ स्पर्धकांनीही यात सहभाग नोंदवला होता.

### ऑलिम्पियन पदकविजेत्या योगेश्वर दत्तची मागणी

## विनेशने देशाची माफी मागावी, देशाला सत्य कळले पाहिजे!


वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरल्यानंतर भारताचा कुस्तीपटू योगेश्वर दत्तने विनेश फोगटला संपूर्ण देशाची माफी मागायला सांगितली आहे. जास्त वजनामुळे विनेशला 50 किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत अपात्र ठरवण्यात आले.

विनेश फोगटला ऑलिम्पिकमध्ये अपात्र ठरवण्यात आले होते, जर एखादा खेळाडू अपात्र ठरला असेल तर त्याने संपूर्ण देशासमोर माफी मागितली पाहिजे की माझ्याकडून चूक झाली, मी पदक गमावले, पण त्याला एक असे स्वरूप देण्यात आले की पीएम मोदींवर आरोप झाले,असे लंडन ऑलिम्पिकचा कांस्यपदक विजेता योगेश्वर दत्त म्हणाला,

विनेश फोगाटने काँग्रेसच्या तिकिटावर हरियाणाची निवडणूक लढवल्याच्या मुद्द्यावर योगेश्वर यांनी हिंदी वृत्तवाहिनीवरील

**फोगाटला पॅरिसमध्ये अपात्र ठरवण्यात आले होते**





एका कार्यक्रमात सांगितले की, राजकारणात जाणे हा वैयक्तिक निर्णय आहे, पण देशाला सत्य कळले पाहिजे, मी एवढेच म्हणेन की ज्या घटना घडल्या आहेत. गेल्या वर्षभरात घडलेल्या घटना, ऑलिम्पिकमधील अपात्रतेचे असोत किंवा जंतरमंतरवरील कुस्तीपटूंचे आंदोलन असो, भारताची चुकीची प्रतिमा निर्माण केली आणि जगभर त्याचा चुकीचा प्रचार केला.

योगेश्वर पुढे म्हणाले, जंतरमंतरवर आंदोलनाबाबत चुकीची माहिती देऊन लोकांना बोलावण्यात आले. हे पूर्णपणे चुकीचे होते. देशाने पदक गमावल्यानंतरही विनेशचे काहीतरी चुकले असाच समज निर्माण झाला होता. विनेशच्या जागी मी असतो तर मी संपूर्ण देशाची माफी मागितली असती की मी माझे वजन कमी करू शकलो नाही, पण इथे माझे स्वागत होत आहे.

***राजकारणापेक्षा कुस्ती सोपी***

*योगेश्वरला राजकारण आणि कुस्तीबद्दल विचारले असता तो म्हणाला, कुस्ती सोपी आहे कारण राजकारणाच्या खेळात तुम्ही आयुष्य घालवाल, पण राजकारण शिकता येणार नाही. लोकांशी खोटे बोलणे आणि त्यांना फसवणे ही राजकारणातील सर्वात चुकीची गोष्ट आहे असे मला वाटते.योगेश्वर दत्त म्हणाला, राजकारणात डोके मोजले जातात, पण कुस्तीत तुमची ताकद काम करते. राजकारणात आल्यावर कोण सोबत आहे आणि कोण नाही हे कळते. असे लोकही पुढे सरसावतात ज्यांचे अस्तित्व नसते.*

## STAIRSच्या महाराष्ट्र गव्हर्निंग कौन्सिलच्या अध्यक्षपदी आमदार सत्यजीत तांबे

### 'एक महाराष्ट्र एक ध्येय' चे उदिष्ट



छायाचित्र - अनिल पानस्कर

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रात क्रीडा विकास जिल्हास्तरीय सामने या महिन्यात सुरू होणार आहेत. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाद्वारे मान्यताप्राप्त राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन संस्थाने 'एक महाराष्ट्र एक ध्येय' उपक्रमाच्या शुभारंभाची घोषणा केली आहे. हा उपक्रम देशव्यापी 'एक भारत एक ध्येय' कार्यक्रमाचा एक भाग आहे. तळागाळातील क्रीडा विकासाला चालना देणे आणि संपूर्ण महाराष्ट्रातील युवा खेळाडूंचे सक्षमीकरण करणे हा मुख्य उद्देश आहे. 'एक महाराष्ट्र एक ध्येय' हा उपक्रम आमदार सत्यजीत तांबे यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. यावेळी आ. सत्यजीत तांबे यांची STAIRS फाउंडेशन महाराष्ट्राच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

हा उपक्रम खेळातील युवकांच्या सहभागाला पेरणा देईल आणि उत्कृष्ट क्रीडा केंद्र म्हणून योगदान देईल. 'एक महाराष्ट्र एक ध्येय' कार्यक्रम राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात राबविण्यात येणार असून, डिसेंबर २०२४ च्या दुस-या आठवड्यात राज्यस्तरीय अंतिम फेरी होणार आहे.स्टेअर्स फाऊंडेशन महाराष्ट्र गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष आ. सत्यजीत तांबे त्यांच्या जय हिंद युथ क्लब आणि 'युनोव्हेशन' केंद्रांच्या माध्यमातून युवक आणि क्रीडा विकासात सक्रियपणे सहभागी होणार आहेत.

आमदार सत्यजीत तांबे म्हणाले की, STAIRS फाउंडेशनच्या सहकार्याने 'एक महाराष्ट्र एक ध्येय' उपक्रमाचे नेतृत्व करताना मला खूप सन्मान वाटतो. क्रीडापटूंच्या पुढच्या पिढीचे पालनपोषण करण्यासाठी तळागाळात क्रीडा विकास आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध क्रीडा संस्कृतीमुळे, हा उपक्रम संभाव्यपणे जीवन बदलू शकतो आणि खेळात योगदान देऊ शकतो. भारताच्या ऑलिम्पिक आकांक्षाच्या दृष्टीने या उपक्रमाद्वारे शिस्त, सांघिक कार्य आणि लवचिकता, तयारीची मूल्ये रुजवण्यासाठी प्रयत्न होईल. व्यक्ती केवळ खेळात यश मिळवण्यासाठीच नाही तर जीवनातही यश मिळवण्यासाठी धडपड करत असतो.

***तळागाळातील क्रीडापटूंना प्रोत्साहन देणार***

*सोसायटी फॉर ट्रान्सफॉर्मेशन, इन्क्लुजन अँड रिकग्निशन थ्रू स्पोर्ट्स (STAIRS) ही राष्ट्रीय संस्था आहे. जी २००० मध्ये स्थापन झाल्यापासून तळागाळातील क्रीडा आणि युवा विकासात आघाडीवर आहे. ही संस्था क्रीडा बरोबरच शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य विकास यांना ही प्राधान्य देईल.*

## इराणी कपसाठी अजिंक्य रहाणेकडे मुंबईच्या नेतृत्वाची धुरा

### श्रेयस आणि शार्दुलचाही संघात समावेश; लखनौमध्ये 1 ऑक्टोबरला स्पर्धा

प्रतिनिधी
■ मुंबई

इराणी चषकासाठी मुंबईने अनुभवी अजिंक्य रहाणेकडे कर्णधारपद सोपवले आहे. श्रेयस अय्यर आणि शार्दुल ठाकूर यांचाही संघात समावेश असेल. श्रेयसने दुलीप ट्रॉफीमध्ये भाग घेतला होता, तर शार्दुल दुखापतीनंतर पुनरागमन करत आहे. तर रहाणे नुकताच इंग्लंडमध्ये काउंटी क्रिकेट खेळत होता. 2023 रणजी करंडक चॅम्पियन मुंबईचा सामना इराणी चषकात शेष



भारताशी होणार आहे. लखनौच्या एकाना स्टेडियमवर 1 ते 5 ऑक्टोबर दरम्यान हा सामना खेळवला जाईल.

भारताचा अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूरवर या वर्षी जूनमध्ये घोट्याच्या दुखापतीवर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. शस्त्रक्रियेनंतर तो 3 महिने क्रिकेटपासून दूर राहिला. त्यानंतर सप्टेंबरमध्येच कर्नाटकच्या स्पर्धेत भाग घेतला. तो इराणी चषकासाठी उपलब्ध असेल, असे मुंबई क्रिकेट असोसिएशनने सांगितले. मंगळवारपर्यंत इराणी चषकासाठी संपूर्ण संघ जाहीर केला जाऊ शकतो.

***रहाणेच्या नेतृत्वाखाली मुंबईने विजेतेपद पटकावले होते***

*2015-16 पर्यंत मुंबईने 41 रणजी ट्रॉफी जिंकली होती. पुढील 6 स्पर्धांमध्ये संघाला पुन्हा ट्रॉफी जिंकता आली नाही. 2016 आणि 2021 मध्ये संघ अंतिम फेरीत पोहोचला होता, पण सौराष्ट्र आणि मध्य प्रदेशकडून पराभूत झाला होता.गेल्या वर्षी पुन्हा अजिंक्य रहाणे टीम इंडियातून बाहेर पडला होता. त्यानंतर मुंबईने त्याला आपल्या रणजी संघाचा कर्णधार बनवले. संघाने चमकदार कामगिरी करत अंतिम फेरीत विदर्भाचा पराभव करून 42व्यांदा रणजी करंडक जिंकला. संघाचे विजेतेपद तब्बल 6 वर्षांनंतर आले.*

## शिवनेरी मंडळाच्या कबड्डी स्पर्धेने मुंबईच्या कबड्डी मोसमाची सुरुवात 3 ऑक्टोबरपासून

**मुंबई:** शिवनेरी सेवा मंडळाच्या विद्यमाने, मुंबई शहर कबड्डी असो. च्या मान्यतेने दि. ०३ ते १३ ऑक्टों. या कालावधीत विशेष व्यावसायिक, व्यावसायिक "अ", महिला तसेच कुमार गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेने मुंबईत कबड्डीच्या मोसमाची सुरुवात होते. दादर(पूर्व) येथील भवानीमाता क्रीडांगणावर होणाऱ्या या स्पर्धेकरीता दोन क्रीडांगणे तयार करण्यात येणार आहेत.

माजी नगरसेवक स्व. मोहन राजाराम नाईक चषकाकरीता खेळविण्यात येणारी ही स्पर्धा सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळविण्यात येते. ज्या संघाना या स्पर्धेत सहभाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपले प्रवेश अर्ज पूर्ण भरून प्रवेश शुल्कासह दिनांक ०१ ऑक्टोंबर पर्यंत मंडळाच्या कार्यालयात जमा करावे.

अधिक माहितीकरिता गुरू मोरजकर (9892973750), राघव परब(9967372628) यांच्याशी संपर्क साधावा. अशी माहिती एका परिपत्रका द्वारे स्पर्धा प्रमुख प्रकाश भोसले यांनी सर्व प्रसार माध्यमांना दिली आहे.

## जातीय अत्याचार टाळण्यासाठी सामाजिक संस्थानी पुढाकार घ्यावा - महेश पोहनेरकर

■ मुंबई

अन्याय आत्यार करणाऱ्या विरोधात समाज म्हणून निषेध केला पाहिजे, अनुसूचित जाती मध्ये जात पाहून लोक सहभागी होतात तसें होता कामा नये, जातीय अत्याचार होऊ नये म्हणून समाज प्रबोधन करणे महत्वाचे आहे सामाजिक संस्थानी या कामी पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे मार्गदर्शन विवेक विचार मंच चे कोकण प्रांत संयोजक महेश पोहनेरकर यांनी गोवंडी येथील संवाद कार्यक्रमात केले. हा कार्यक्रम विवेक विचार मंच, स्वर्गीय अनिकेत ओवाळ स्मृती समिति आणि दिशा ज्योत फाउंडेशन च्या माध्यमातून संविधान अमृत महोत्सव वर्षनिमित्त सामाजिक संवाद मेळाव्याचे आयोजन गोवंडी



एज्युकेशन सोसायटी च्या सभागृहामध्ये करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर विवेक विचार मंच चे महेश पोहनेरकर, प्रांत सहसंयोजक विजयजी वेदपाठक, महानगर संयोजक जयवंतजी तांबे, टोळी सदस्य ऍड संदीप जाधव, स्व. अनिकेत ओव्हाळ स्मृती समिति श्रीमती राजश्रीताई ओव्हाळ, दिशा ज्योत फाउंडेशन ज्योती साठे, वैधकीय अधीक्षक डॉ. वैभवजी देवगिरकर यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. या मेळाव्यात उपस्थित नागरिकांच्या समस्या व प्रश्नांची उत्तर महेश पोहनेरकर यांनी सरळ सोप्या पद्धतीने माहिती दिली. या संवाद मेळाव्यात लव्ह जिहाद ही समस्या आपल्या समाजाने व पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रबोधन केले पाहिजे,

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऍड संदीप पवार यांनी केले. यावेळी माजी नगरसेविका आशाताई मराठे, सामाजिक कार्यकर्त्या स्नेहा भालेराव, पत्रकार ज्ञानेश्वर ठोंबरे, समाजसेवक सुभाष मराठे, डॉ रवींद्र कांबळे आदीसह मोठ्या संख्येने स्थानिक सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## मुंबईतल्या शेकडो इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग अखेर मोकळा

### अभ्युदयनगर वसाहतीचा पुनर्विकासाचे सोमवारी निघणार टेंडर; खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची महिति

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतल्या हजारो इमारतींच्या पुनर्विकासाचा आणि दुरुस्तीचा मार्ग मोकळा झाला असून शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. येत्या सोमवारी काळाचौकी येथील अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाचे टेंडर निघणार असल्याची माहिती खासदार डॉ. शिंदे यांनी दिली. इमारतींच्या विविध प्रश्नांबाबत डॉ. शिंदे यांनी काल वांद्रे पूर्व इथल्या म्हाडा मुख्यालयात म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जैस्वाल यांची भेट घेतली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

शिवसेना जनसंवाद दौऱ्यात खासदार डॉ. शिंदे यांनी नुकताच वरळी, भायखळा, शिवडी, जोगेश्वरी, वांद्रे यांसह विविध मतदारसंघातील नागरिकांच्या भेटी घेतल्या होत्या. या दरम्यान वरळीतील बीडीडी चाळ, कोळीवाडा, पोलीस वसाहत यांसारख्या अनेक इमारतींचा आणि चाळींचा पुनर्विकासाचा प्रश्न रखडला असल्याचे निदर्शनास आले होते. याच पार्श्वभूमीवर म्हाडा मुख्यालयात म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या उपस्थितीत आज बैठक पार पडली, असे डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

मुंबईत अनेक वर्ष रखडलेल्या वरळी, शिवडी-लालबाग,वांद्रे पूर्व आणि भायखळा या विभागातील विविध इमारतींच्या पुर्नविकासाचा प्रश्न या बैठकीत मार्गी लावण्यात आला. बहुचर्चित अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाचे प्रलंबित टेंडर ही येत्या सोमवारी काढण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. या पुनर्विकासातून २५ हजार रहिवाश्यांना हक्काच्या अत्याधुनिक सुविधाजनक सदनिका मिळणार आहेत.

याबरोबरच वरळी, शिवडी भायखळा आणि वांद्रे पूर्व इथल्या म्हाडा, एसआरए आणि पीएमजीपी इमारतींचा पुनर्विकास आणि दुरुस्तीच्या कामांनाही यावेळी मंजुरी घेण्यात आली आहे. वांद्रे आणि वरळी इथल्या सुमारे १४०० इमारतीचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. मात्र गेल्या अनेक वर्षात यावर कोणतेही काम झाले नसल्याचा ठपका शिंदे यांनी गेल्यावेळ च्या सरकारवर ठेवला.

## बसवाहकावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ वडाळा बस आगारात निदर्शने

प्रतिनिधी
■ मुंबई

बस वाहक अशोक डगळे, बस वाहक, परि. क्र. ११२७२७, विक्रोळी आगार यांच्यावर १९.०९.२०२४ रोजी रूट क्र. ७ वर काम करीत असताना त्यांच्यावर अज्ञात इसमाने धारदार चाकुने प्राणघातक हल्ला केला त्यात अशोक डगळे हे जबर जखमी झाले.




ह्या घटनेचा काल दि बेस्ट वर्कर्स युनियनच्यावतीने सोमवारी वडाळा आगारासमोर निदर्शने करुन निषेध करण्यात आला. या निदर्शनचे नेतृत्व सरचिटणीस, कामगार नेते शशांक राव यांनी केले.

सद्या कर्तव्यावर असणाऱ्या बेस्ट कर्मचाऱ्यांवर अज्ञात व्यक्तींकडून हल्ले होण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत, त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बेस्ट कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्यात यावे, त्याच प्रमाणे भविष्यात अश्या घटना घडू नयेत, यासाठी प्रशासनाकडून ठोस पाऊले उचलण्यात यावीत. अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच अशोक डगळे यांचा सर्व वैद्यकीय खर्च प्रशासनाकडून करण्यात यावा. व त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या इसमावर पोलिसात गुन्हा नोंदवून त्याच्यावर सख्त कारवाई करण्याचे आदेश पोलिसांनाद्यावेत. अशाही मागण्या करण्यात आल्या.

## सहकारी संस्थांनी त्यांच्या निधीची गुंतवणूक मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतच करावी

### आ.प्रविण दरेकरांचे वार्षिक सर्वसाधारण सभेत आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई व उपनगरांत सुमारे साडे तीन लाख इतक्या सहकारी संस्था असून या संस्थांकडे एकूण एक लाख कोटीच्या ठेवी आहेत. मुंबई जिल्हा बँक मुंबई व उपनगरातील संस्थांची पालक बँक आहे. अनेक सहकारी संस्थांच्या ठेवी इतर बँकांमधून गुंतविलेल्या आहेत. सहकारी संस्थांनी व्यवसाय करताना सुसंगत भुमिका घेतल्यास सहकारातील फायदा सहकारातच राहील. यासाठी सहकारी संस्थांनी त्यांच्याकडील निधीची गुंतवणूक मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत करावी जेणेकरून त्या निधीचा वापर सहकारी संस्थांच्या वाढीसाठी करता येईल, असे आवाहन भाजपा गटनेते व मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी



बँकेच्या ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केले.

सोमवारी यशवंतराव नाट्य मंदिर येथे मुंबई जिल्हा बँकेची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष आ. प्रविण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या प्रसंगी मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, संचालक व आमदार प्रसाद लाड, ज्येष्ठ संचालक शिवाजीराव नलावडे, पुरुषोत्तम दळवी, प्रकाश दरेकर, नंदकुमार काटकर, नितीन बनकर, संदीप घनदाट, विठ्ठल भोसले, आनंदराव गोळे, जयश्री पांचाळ, जिजाबा पवार यांसह बँकेचे अधिकारी, कर्मचारी वर्ग उपस्थित होते. त्याचबरोबर यावेळी मुंबईतील मुंबई जिल्हा बँकेच्या सभासदांची ही प्रचंड गर्दी होती.

यावेळी आपले मनोगत मांडताना आ. दरेकर म्हणाले कि, बँकेला सातत्याने ५ ते ६ वर्ष 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त झाला आहे. मुंबई बँकेची अनेक वर्ष प्रलंबित असलेली मोबाईल नेट बँकिंग सेवेची परवानगी रिझर्व्ह बँकेकडून आपल्याला मंजूर झाली आहे. ही सेवा ग्राहकांना, सहकारी संस्थांना पुढील दोन महिन्यात उपलब्ध करून देण्यात येईल, असा ठाम विश्वासही दरेकरांनी उपस्थितांना दिला.

***उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आभार***

*यावेळी बोलताना आमदार दरेकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही आभार मानले. ते म्हणाले कि, सायन, प्रतीक्षा नगर येथे म्हाडाची जागा सहकार भवनसाठी उपलब्ध करून दिल्याबद्धल मी आपल्या सर्वांच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो.*

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता [शहर] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक ) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४८४) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण २५ कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक २५.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक ०२.१०.२०२४ सायंकाळी ५.३५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त http://mahatenders.gov.in, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर) / मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO/A/741
Follow us: @mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

**महाराष्ट्र शासन**
सत्यमेव जयते
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई ( सा. बां.) विभाग,**
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in

**ई-निविदा सुचना क्र. १४ सन २०२४ २०२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई ( सा.बां.) विभाग, मुंबई ( दुरध्वनी / फॅक्स क्रमांक- २६२३१९६४ / २६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई ( सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई ( सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगौण कामांतर्गत देवनार येथे पुनर्वसन केंद्र कार्यालय बाजू, सुशोभीकरण आणि लँडस्केपिंग करणे. | रु.२२७५५५३/- |
| २ | मुळगौण कामांतर्गत देवनार येथे पुनर्वसन केंद्र दवाखाना बाजू, सुशोभीकरण आणि लँडस्केपिंग करणे. | रु.२२५२३३९/- |
| ३ | मुळगौण कामांतर्गत देवनार येथे पुनर्वसन केंद्र बॅरॅक बाजू, सुशोभीकरण आणि लँडस्केपिंग करणे. | रु.२५०४२८७/- |
| ४ | मुळगौण कामांतर्गत बालकल्याण नगरी. चिल्ड्रन एड सोसायटी, मानखुर्द, मुंबई येथे खेळाच्या मैदानाचे आणि आसन व्यवस्थेचे अपग्रेडेशन करणे. | रु.२३७०५६२/- |
| ५ | मुळगौण कामांतर्गत बालकल्याण नगरी. चिल्ड्रन एड सोसायटी, मानखुर्द येथे पी/एफ चेनलिंक फेन्सिंग, करणे | रु. २९५८८०६/- |
| ६ | मुळगौण कामांतर्गत मानखुर्द येथील चेंबूर चिल्ड्रन होम, बॅरेक क्र. ६ ते ११ चेकर टाइल्स देणे आणि घालणे. | रु. १०३७३४१/- |
| ७ | मुळगौण कामांतर्गत मानखुर्द येथील चेंबूर चिल्ड्रन होम स्टाफ बॅरेक चेकर्ड टाइल्स देणे आणि घालणे | रु.१७३३३२५/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यांत येईल.

**ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. १८.०९.२०२४ ते दि. २५.०९.२०२४ पर्यंत**
**ई निविदा उघडणे दि. २६.०९.२०२४ दुपारी १५.०० वाजता.**

जा.क्र.काअ/उर्मुवि/निविदा/ ८८३६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई ( सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :- 11 SEP 2024

सही/-
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई ( सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी३३११

## इस्रायलचा सलग दुसऱ्या दिवशी लेबनॉनवर हवाई हल्ला

**बेरूत:** इस्रायलने मंगळवारी पुन्हा एकदा लेबनॉनमध्ये हवाई हल्ला केला. इस्रायलने राजधानी बैरूतमधील हिजबुल्लाच्या स्थानांना लक्ष्य केले आहे. त्याचवेळी हिजबुल्लाहने काल रात्री इस्रायलमधील 8 ठिकाणांना क्षेपणास्त्रांनी लक्ष्य केल्याचा दावाही केला आहे. इस्रायलच्या म्हणण्यानुसार हिजबुल्लाहकडून 55 रॉकेट डागण्यात आले. सोमवारी, इस्रायली संरक्षण दलाने (आयडीएफ) लेबनॉनमध्ये हिजबुल्लाहच्या 1600 स्थानांवर हवाई हल्ला केला. 10 हजार रॉकेट नष्ट केल्याचा दावा करण्यात आला आहे. त्याचवेळी लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, या हल्ल्यात आतापर्यंत 558 लोकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये 94 महिला आणि 50 मुले आहेत. तर 1,835 लोक जखमी झाले आहेत. अल जझीराच्या मते, 2006 मध्ये इस्रायल-लेबनॉन युद्धानंतर लेबनॉनवरील हा सर्वात मोठा हल्ला आहे. 2006 मध्ये, महिनाभर चाललेल्या लढाईत 1,000 लेबनीज लोक मारले गेले. सध्या लेबनॉनमध्ये बुधवार, 25 सप्टेंबरपर्यंत शाळा आणि महाविद्यालये बंद ठेवण्यात आली आहेत.



# शाश्वत विकास उद्दिष्टांच्या राष्ट्रीय स्तरावरील पूर्ततेसाठी महाराष्ट्राचे योगदान महत्त्वाचे - विधानसभा अध्यक्ष नार्वेकर

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी कार्यक्रम-२०३० संदर्भात केंद्र शासनाच्या प्रयत्नांसाठी महाराष्ट्राची बांधिलकी आणि योगदान महत्त्वाचे आहे. उद्योग, तंत्रज्ञान आणि कृषी या क्षेत्रांच्या विकासासाठीचा एकात्मिक दृष्टीकोन स्वीकारण्यात आला आहे. शाश्वत विकास उद्दिष्टपूर्ती बरोबरच भारताला समृद्ध आणि विकसित राष्ट्र बनविण्यासाठी महाराष्ट्राचे योगदान सर्वाधिक महत्त्वाचे ठरत आहे, असे महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी केले. राष्ट्रकुल



संसदीय मंडळ, भारत विभागाच्या (CPA India Region) १० व्या परिषदेत ते बोलत होते.

नवी दिल्ली येथे दिनांक २३ व २४ सप्टेंबर, २०२४ रोजी लोकसभा अध्यक्ष आणि राष्ट्रकुल संसदीय मंडळ, भारत विभागाचे प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद "शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासासंदर्भात विधानमंडळांची भूमिका" या विषयावर आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेस महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे उपस्थित आहेत. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली आणि राज्यसभेचे उपसभापती श्री. हरिवंश यांच्या प्रमुख उपस्थितीत या दोन दिवसीय परिषदेस प्रारंभ झाला. परिषदेतील चर्चासत्रात ॲड. राहुल नार्वेकर यांनी आपले विचार मांडले.

पर्यावरण रक्षणासाठी सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन, समृध्दी महामार्गालगत बांबू लागवड यावर भर देण्यात येत आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरीकरणाचा वेग असलेले राज्य असल्याने सार्वजनिक वाहतुकीचे विस्तारते जाळे, इलेक्ट्रिक वाहने, सुनियोजित गृहनिर्माण प्रकल्प या मुद्यांकडे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी आपल्या भाषणात उपस्थितांचे लक्ष वेधले. विधानमंडळ म्हणून विचार करता केवळ आर्थिक विकास हेच एकमेव मानक स्वीकारून चालणार नाही तर सर्वसमावेशक विकास स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना पायाभूत सोयीसुविधांचा वापर शहरांबरोबरच ग्रामीण विभागात वाढत्या रोजगार संधी निर्माण करणे या बाबींकडेही लक्ष देणे गरजेचे असल्याचे ॲड. नार्वेकर यावेळी म्हणाले.

# भारत आणि चीनमध्ये सँडविच बनणार नाही

**वृत्तसंस्था**
**कोलंबो**



श्रीलंकेचे नवे राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांनी म्हटले आहे की, त्यांना भारत आणि चीन यांच्यात सँडविच बनायचे नाही. एका खासगी मॅगझिनला दिलेल्या मुलाखतीत अनुरा म्हणाले की, श्रीलंकेला कोणत्याही जागतिक राजकीय लढाईत अडकायचे नाही.

आम्ही कोणत्याही प्रकारच्या स्पर्धेत भाग घेणार नाही किंवा वर्चस्वासाठी लढणाऱ्या कोणत्याही देशाला पाठिंबा देणार नाही. राष्ट्रपती म्हणाले, दोन्ही देश आमचे चांगले मित्र आहेत, मला आशा आहे की भविष्यात आमची भागीदारी चांगली राहील.

युरोपियन युनियन (EU), मध्य पूर्व आणि आफ्रिका यांच्याशी चांगले संबंध ठेवणार असल्याचे दिसानायके यांनी सांगितले. श्रीलंकेचे परराष्ट्र धोरण निःपक्षपाती असेल. श्रीलंका बँक भ्रष्ट आहे दिसानायके यांनी कालच राष्ट्रपतिपदाची शपथ घेतली होती. 2022 मध्ये श्रीलंकेतील आर्थिक संकटानंतर झालेल्या निवडणुकीत त्यांना त्यांचे प्रतिस्पर्धी सजिथ प्रेमदासा यांच्याकडून 10 लाखांहून अधिक मते मिळाली. तर श्रीलंकेचे माजी राष्ट्रपती तिसऱ्या क्रमांकावर होते.

दिसानायके म्हणाले, "श्रीलंकेच्या बँका भ्रष्ट आहेत. आमच्यावर 28 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे. देशाचे आर्थिक संकट सोडवणे हे माझे प्राधान्य आहे." भारत आणि चीन व्यतिरिक्त पाकिस्तान आणि मालदीवमधूनही श्रीलंकेच्या नवीन राष्ट्रपतींचे अभिनंदन करण्यात आले आहे. अनुरा यांनी 5 वर्षांपूर्वी पक्ष पुन्हा सुरू केला आणि अध्यक्षपदापर्यंत पोहोचले उत्तर मध्य प्रांतातील थम्बुटेगामा येथील रहिवासी असलेल्या अनुरा यांनी कोलंबो येथील केलानिया विद्यापीठातून विज्ञान शाखेत पदवी प्राप्त केली. 1987 मध्ये भारतविरोधी बंडखोरी शिगेला असताना ते JVP मध्ये सामील झाले. पक्षाने दोनदा रक्तरंजित बंडखोरी केली होती.

अनुरा 2014 मध्ये पक्षप्रमुख बनले. 2019 मध्ये, JVP चे नाव NPP झाले. भारत सरकारच्या निमंत्रणावरून अनुरा फेब्रुवारी 2024 मध्ये नवी दिल्लीत आले होते. त्यांनी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची भेट घेतली.

या भेटीत अनुरा यांनी द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यावर चर्चा केली. भारत हा नेहमीच श्रीलंकेचा विश्वासू मित्र आणि विश्वासार्ह भागीदार राहील यावर जयशंकर यांनी भर दिला. भारतातून परतल्यानंतर अनुरा यांनी 'आमच्या पक्षाच्या 'राजकीय आणि आर्थिक धोरणात' काही बदल झाला आहे, असा भारतासोबत झालेल्या उच्चस्तरीय बैठकींचा अर्थ लावला जाऊ नये, असे म्हटले होते. माहिती तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रात आपण भारताकडून खूप काही मिळवू शकतो. देशात बदल घडवून आणण्याची अपेक्षा आहे. अशा परिस्थितीत आपल्याला आंतरराष्ट्रीय समर्थनाची गरज आहे. आपण एकाकी देश म्हणून जगू शकत नाही, आपल्याला

## गुजरातच्या शाळेत 6 वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून हत्या

**दाहोद**

गुजरातमधील दाहोद जिल्ह्यातील पिपलिया गावातील एका प्राथमिक शाळेच्या पहिल्या वर्गात शिकणाऱ्या 6 वर्षीय मुलीचा मृतदेह तीन दिवसांपूर्वी शाळेतूनच सापडला होता. आता शाळेच्या मुख्याध्यापकानेच मुलीवर बलात्काराचा प्रयत्न करत तिची हत्या केल्याचे या प्रकरणात उघड झाले आहे. हत्येनंतर मुलीचा मृतदेह शाळेच्या खोलीच्या मागेच फेकून दिला होता. पिपलिया गावातील तोयनी प्राथमिक शाळेत ही मुलगी पहिलीच्या वर्गात शिकत होती. दररोजप्रमाणे गुरुवारी (19 सप्टेंबर) सकाळीही ती 10 वाजता बॅग घेऊन घरातून निघाली. शाळेची वेळ संपली तरी सायंकाळी पाचपर्यंत ती घरी पोहोचली नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला. आधी ती खेळायला जायची अशा जवळपासच्या घरांमध्ये तिचा शोध घेण्यात आला. मुलगी न सापडल्याने कुटुंबातील व गावातील अनेकांनी शाळा गाठली. शाळेला कुलूप होते, त्यामुळे काही लोक भिंतीवर चढून शाळेत घुसले. तपासात मुलगी पाठीवर पडून असल्याचे दिसून आले. घरच्यांनी लगेच त्याला खडसावले. कम्युनिटी सेंटरला नेले. मात्र, त्यापूर्वीच मुलीचा मृत्यू झाला होता.

## तामिळनाडूमध्ये नर्सिंगच्या विद्यार्थिनीवर गँगरेप

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

कोलकातानंतर आता तामिळनाडूमध्ये आणखी एका आरोग्य सेविकेवर बलात्काराचे प्रकरण समोर आले आहे. राज्यातील दिंडीगुल थेणी येथील नर्सिंग विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार झाला आहे. अज्ञातांनी पीडितेचे अपहरण



केल्याचे पोलिसांनी सांगितले.

यानंतर सामूहिक बलात्कार झाला. त्यानंतर त्यांनी तिला दिंडीगुल रेल्वे स्थानकाजवळ सोडून पळ काढला. जखमी पीडितेने रेल्वे स्थानकावर पोलिसांकडे मदत मागितली. पीडितेला दिंडीगुल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, तिच्यावर उपचार सुरू आहेत. दिंडीगुल जिल्ह्याचे एसपी प्रदीप यांनी सांगितले की, एफआयआर नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## अंगणवाडीत नोकरीसाठी उर्दूची सक्ती; कर्नाटक सरकारचा निर्णय चर्चेत!

### जीआरवर भाजपाची आगपाखड

**वृत्तसंस्था**
**बंगळुरु**



अंगणवाडी शिक्षक पदासाठीच्या भरतीसाठी इतर काही नियमित निकषांप्रमाणेच उर्दू सक्तीची करण्याचा निकष समाविष्ट करण्याबाबत नुकताच कर्नाटक सरकारने निर्णय घेतला आहे. त्यानुसार जीआरदेखील काढण्यात आला आहे. मात्र, या निर्णयाला कर्नाटकमधील विरोधी पक्ष भारतीय जनता पक्षानं तीव्र शब्दांत आक्षेप घेतला आहे. मुस्लीम समुदायाचं लांगुलचालन करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप भाजपाकडून करण्यात आला आहे. त्यामुळे कर्नाटक सरकारचा हा जीआर चर्चेचा विषय ठरला आहे.

कर्नाटकमधील सिद्धरामय्या सरकारनं यासंदर्भात जारी केलेल्या जीआरवर भाजपाकडून टीका केली जात आहे. राज्यात अंगणवाडी शिक्षिकांची भरती करण्यासाठी काँग्रेस सरकारने जीआर काढला आहे. कर्नाटकच्या चिकमंगळुरू व मुदीगरे जिल्ह्यात अंगणवाडी शिक्षिका भरतीसाठी हा जीआर काढण्यात आला आहे. मात्र, या जीआरमधील एका निकषामुळे त्यावर टीका होत आहे. भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना उर्दू भाषा येणं सक्तीचं असल्याचं या जीआरमध्ये नमूद करण्यात आलं आहे.

## पत्रकार हरिश्चंद्र पाठक यांना पितृशोक

**जौनपूर**

मुंबईतील हिंदी वृत्तपत्राचे पत्रकार हरिश्चन्द्र पाठक यांना पितृशोक झाला आहे. घाटकोपर हिंदी हायस्कूलचे सेवानिवृत्त शिक्षक लालता प्रसाद पाठक सर यांचे सोमवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी सकाळी ८ च्या सुमारास जौनपूर येथील एका खाजगी रुग्णालयात दुःखद निधन झाले असून निधन समयी ते ९१ वर्षांचे होते. लालता



प्रसाद यांच्या निधनामुळे पाठक कुटुंबीय शोकाकुल झाला आहे. सेवानिवृत्त झाल्या नंतर गेल्या काही वर्षांपासून लालता प्रसाद पाठक सर आपल्या उत्तर भारतातील मूळ गावी राहत होते. असल्फा येथील त्यांच्या निवासस्थानी हरिश्चन्द्र कुटुंबीय राहत होते. गेल्या काही दिवसापासून लालता प्रसाद यांची प्रकृती बिघडली होती त्यामुळे त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असताना त्यांची प्राणज्योत मावळली. दिवंगत लालता प्रसाद पाठक यांच्या पश्चात दोन मुलगे आणि तीन मुली नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी गावी करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ आणि पाठक परिवार उपस्थित होते.

पान १ वरुन

### 'लाडकी बहीण योजना' मतांसाठी केलेला जुगाड

हम क्या रामदेव बाबा के कार्यकर्ता हैं?", असं भाजप आमदार टेकचंद सावरकर संबंधित व्हिडीओत बोलताना दिसत आहेत. "मी हिंदीत भाषण देत होतो. भाषणाचा विपर्यास केला आहे. महिलांना एकत्र आणलं आहे. शासनाच्या योजना पोहचविण्यासाठी जुगाड केला आहे. मतदानासाठी ही योजना आहे, असा अर्थ होत नाही. सुनील केदार यांनी ही योजना बंद करण्याचे वक्तव्य केलं आहे. काँग्रेस जवळ काहीच नाही म्हणून एडिट करून व्हिडीओ व्हायरल करत आहोत. मी मेळावे घेतले आहेत", असा खुलासा टेकचंद सावरकर यांनी केला. "सरकारवर याचा कुठलाही परिणाम होत नाही. विरोधकांचे कामच आहे, व्हिडीओ व्हायरल करणे, ही योजना जुमला आहे, असं विरोधक म्हणायचे. सरकारी योजना लोकांना लाभ देण्यासाठी असतात, याचा येणाऱ्या काळात फायदा होऊ शकतो", असा दावा टेकचंद सावरकर यांनी केला.

### चाईल्ड पॉर्नोग्राफीत सहभागी असल्याचा आरोप

मीरा बोरवणकर यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केल्याचा याचिकेतून दावा करण्यात आला. आरोपी हायकोर्टानं स्थापन केलेल्या विशेष समितीपुढे गेला तर प्रकरण वेगळ्याच वळणार जाईल, या भीतीनं त्याचा एन्काऊंटर झाल्याचा याचिकेतून गंभीर आरोप करण्यात येत आहे. तसेच ट्रस्टी आणि शाळेतून सीसीटीव्ही गायब करणारा कर्मचारी अद्याप फरार असल्यानं ठाणे पोलीस आणि एसआयटीच्या कारभारावर सवाल उपस्थित केला जात आहे.

### निवडणुकीदरम्यान मतभेद बाजूला ठेवा

यावेळी अमित शहा यांनी भाजपच्या प्रत्येक पदाधिकाऱ्याने बुथपातळीवर जाऊन काम करण्याचे आवाहन केले. महाविकास आघाडीतील शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेसचे बुथपातळीवरील कार्यकर्ते भाजपमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करा. विरोधकांना बुथपातळीवर कमकुवत करण्यावर भर द्या, असे अमित शाह यावेळी म्हणाले. देशभरात वक्फ संशोधन बिलावरून विविध चर्चांना उधाण आले आहे. याबाबत गृहमंत्री अमित शाह यांनी महत्त्वाची माहिती दिली. हे बिल संसदेच्या पुढील अधिवेशनात मंजूर होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## बडोद्यातील संकल्पभुमी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक लवकरच उभारले जाईल

**वृत्तसंस्था**
**बडोदा**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बडोदा संस्थानातील नोकरी सोडल्यानंतर 23 सप्टेंबर 1917 रोजी सयाजी गार्डन मधील वृक्षाखाली बसुन अस्पृश्यता निवारणाचा संकल्प केला होता. समाजाला न्याय हक्क मिळवुन देईल. समजात समता स्थापन करण्याचा संकल्प केला होता. त्या ऐतिहासीक स्थळाला संकल्प भुमि म्हणून आंबेडकरी जनता दरवर्षी नतमस्तक होते. बडोद्यातील सयाजी गार्डन मधील या संकल्पभुमिला दरवर्षी 23 सप्टेंबरला देशभरातुन आंबेडकरी जनता मोठ्या संख्येने अभिवादनासाठी एकत्र येते.

### संकल्पभुमी स्मारकाला लाइट अँड साऊंड शो साठी 10 कोटीचा निधी केंद्रसरकारकडुन मिळवुन देणार - रामदास आठवले

या संकल्पभुमिला 107 वर्ष झाली असून संकल्पभुमी ही देशभरातील आंबेडकरी जनतेसाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे संकल्प भूमी जवळ गुजरात राज्य सरकारच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक 27 कोटी खर्च करुन उभारण्यात येत आहे. येत्या



डिसेंबर पर्यंत हे स्मारक पूर्ण होईल. या स्मारकात लाईट आणि साउंड शो सुरु करण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने 10 कोटीचा निधी मिळवुन देण्यासाठी आपण प्रयत्न करु तसेच गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनाही आपण या स्मारकात लाईट ॲन्ड साऊंड शो सुरु करण्यासाठी 10 कोटीचा निधी देण्यासाठी पत्र पाठवणार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

देशभरातील आंबेडकरी जनतेला प्रेरणादायी असणा-या संकल्पभुमि येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक लवकर उभारले जाईल.हे स्मारक चार मजल्यांचे असून त्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे स्मारकातील सजावटी चे अंतर्गत काम वेगाने पूर्ण करण्यात येत आहे असे आठवले यांनी सांगितले.

## यूपीमध्ये खाद्यपदार्थांच्या दुकानांवर नेमप्लेट अनिवार्य

**पाटणा ।** तिरुपती मंदिराच्या प्रसादामध्ये प्राण्यांची चरबी आढळल्याच्या वृत्तादरम्यान, यूपी सरकारने खाद्यपदार्थांच्या दुकानांच्या नेमप्लेटवर दुकानदाराचे नाव लिहिणे बंधनकारक केले आहे. मुख्यमंत्री योगी यांनी मंगळवारी हे आदेश दिले. ते म्हणाले- अन्नपदार्थांमध्ये मानवी कचरा मिसळणे घृणास्पद आहे. हे अजिबात सहन होणारे नाही. असे आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल. मंगळवारी योगी यांनी अन्न विभागासोबत बैठक घेतली. मुख्यमंत्री म्हणाले, राज्यातील सर्व हॉटेल्स, ढाबे आणि रेस्तरॉंची कसून तपासणी करावी. प्रत्येक कर्मचाऱ्याचे पोलिस व्हेरिफिकेशन झाले पाहिजे. खाद्यपदार्थांच्या शुद्धतेसाठी अन्न सुरक्षा कायद्यात आवश्यक सुधारणा कराव्यात.

## काश्मिरात दुसऱ्या टप्प्यातील 26 जागांसाठी आज मतदान

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात उद्या बुधवारी (25 सप्टेंबर) 6 जिल्ह्यांतील 26 विधानसभा जागांवर मतदान होणार आहे. यामध्ये 25.78 लाख मतदार मतदान करू शकतील.

दुसऱ्या टप्प्यातील 26 जागांपैकी 15 जागा मध्य काश्मीरमधील आणि 11 जागा जम्मूमधील आहेत. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार दुसऱ्या टप्प्यात 239 उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये 233 पुरुष आणि 6 महिला आहेत.

दुसऱ्या टप्प्यात 131



उमेदवार कोट्यधीश असून 49 जणांवर गुन्हे दाखल आहेत. जम्मू-काश्मीर भाजपचे अध्यक्ष रविंदर रैना यांनी आपली संपत्ती फक्त 1,000 रुपये असल्याचे जाहीर केले आहे.

माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला हे गांदरबल आणि बिरवाहमधून निवडणूक लढवत आहेत. तिहार तुरुंगातून निवडणूक लढवलेल्या अभियंता रशीद यांच्याकडून लोकसभा निवडणुकीत उमर यांनी बारामुल्लाची जागा गमावली होती. यावेळीही तुरुंगात बंद असलेले सर्जन अहमद वागे उर्फ आझादी चाचा हे गांदरबल मतदारसंघात त्यांच्या विरोधात निवडणूक रिंगणात आहेत.

# मेलबर्न विद्यापीठाने दिल्लीत सुरू केले ग्लोबल सेंटर

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

दिल्लीत मेलबर्न विद्यापीठाने आपले पहिले मेलबर्न ग्लोबल सेंटर सुरू केले असून यामुळे त्याच्या जागतिक उपस्थितीचा लक्षणीय विस्तार पहायला मिळत आहे. हा महत्वपूर्ण टप्पा एका अशा प्रमुख प्रतिनिधीमंडळाचा भाग आहे जे स्थानिक विद्यार्थी, माजी विद्यार्थी, सरकारी अधिकारी आणि शैक्षणिक भागीदार यांच्याशी भागीदारी आणि सहभाग वाढविण्यासाठी भारत दौऱ्यावर आलेले आहे.

मेलबर्न ग्लोबल सेंटर - दिल्ली योजनाबद्ध पद्धतीने भारताच्या केंद्र सरकारच्या जिल्ह्याच्या मध्यभागी स्थित आहे. हे व्यवसाय, आंतरराष्ट्रीय एजन्सी आणि ऑस्ट्रेलियन उच्चायुक्तालय यांच्या समीप आहे. हे केंद्र शिक्षण, संशोधन, उद्योग आणि समुदाय यांच्यात सहकार्य व ज्ञानाची देवाणघेवाण सुलभ करून

**मेलबर्न विद्यापीठाला दिल्लीत असलेल्या केंद्रामुळे आपल्या व्यापक शैक्षणिक ऑफर, अत्याधुनिक संशोधन आणि सामुदायिक सहभाग कार्यक्रम यांचे प्रदर्शन करता येईल.**

विद्यापीठाचे भारतातील मध्यवर्ती केंद्र म्हणून कार्य करणार आहे.

मेलबर्न ग्लोबल सेंटर - दिल्ली मुळे विद्यापीठाला आपल्या व्यापक शैक्षणिक ऑफर, अत्याधुनिक संशोधन आणि सामुदायिक सहभाग कार्यक्रम यांचे प्रदर्शन करता येणार आहे. या केंद्रात सांस्कृतिक सादरीकरण, कला प्रदर्शने आणि व्याख्यानमाला आयोजित केल्या जाणार आहे. हे संशोधनाला भारतीय महामंडळे (कॉर्पोरेशन्स), उद्योग भागीदार व शैक्षणिक संस्था यांच्याशी जोडण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करणार आहे.

उद्घाटन समारंभात भारत आणि ऑस्ट्रेलियन सरकारचे प्रतिनिधी यांच्यासोबत विद्यार्थी, माजी विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ आणि मान्यवर पाहुणे उपस्थित होते. मेलबर्न विद्यापीठाचे उपकुलगुरू (ग्लोबल, कल्चर अँड एंगेजमेंट) प्राध्यापक मायकल वेस्ले म्हणाले, "भारत व आमच्या विद्यापीठ यांच्यादरम्यान शैक्षणिक सहकार्य वाढविण्याच्या आमच्या दीर्घकालीन बांधिलकीत दिल्लीत असलेले आमचे मेलबर्न ग्लोबल सेंटर एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. 16 वर्षांपर्यंतच्या संस्थात्मक भागीदारीवर निर्माण करून, आम्ही भारतात सक्षमीकरण करण्यासाठी व क्षमता वाढविण्यासाठी समर्पित आहोत. यामुळे शिक्षण व संशोधन यांच्या माध्यमातून समाजाला सहकार्याने लाभ मिळवून देण्याच्या आमच्या ध्येयाशी जुळवून घेत आहोत."

प्राध्यापक वेस्ले पुढे म्हणाले, "या वर्षाच्या सुरुवातीला सुरू करण्यात आलेली आमची जागतिक रणनीती, आशिया आणि पॅसिफिक यांच्यासाठी ज्ञान केंद्र बनण्याची आमची बांधिलकी बळकट करत असून शैक्षणिक उत्कृष्टता व आंतरराष्ट्रीय संशोधन सहकार्य यांना एक करत आहे. मेलबर्न ग्लोबल सेंटर - दिल्ली हे भारतातील आमच्या भागीदारी मॉडेलचे एक मूर्तिमंत उदाहरण आहे आणि क्षमता निर्मिती व सहकार्य यांना प्रोत्साहन देत आहे. या प्रदेशाच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करणाऱ्या परस्पर फायदेशीर संबंधांद्वारे हे साध्य केले जात आहे."

मेलबर्न ग्लोबल सेंटर - दिल्लीची स्थापना केल्याने जगातील सर्वात गतिमान क्षेत्र असलेल्या आशिया आणि पॅसिफिक मधील प्रमुख भागीदार देशांमध्ये आपल्या व्यापक जागतिक भागीदारी मॉडेलचे समर्थन करताना भारतातील विद्यापीठाची उपस्थिती आणि सहभाग यांना बळकटी लाभत आहे.

मेलबर्न ग्लोबल सेंटरची रचना शिकवण्यासाठी किंवा एक किनारापार विद्यापीठक्षेत्र (ऑफशोर कॅम्पस) म्हणून केली गेली नाही. त्याऐवजी, त्यात अधिक शाश्वत परिणामासाठी भारतातील वर्तमान व भविष्यातील उपक्रम समृद्ध करण्यावर लक्ष केंद्रित केले जात आहे, जे विद्यापीठाच्या भागीदारी मॉडेलद्वारे निर्धारित केल्याप्रमाणे आणि भारतीय सरकारांनी व संस्थांनी सूचित केल्याप्रमाणे आहे.

हे विद्यापीठ भारतांतर्गत आपले संबंध अधिक दृढ करत आहे आणि अशा वेळेस दिल्लीत असलेले मेलबर्न ग्लोबल सेंटर भारताच्या दीर्घकालीन शैक्षणिक आणि संशोधन आकांक्षांमध्ये मदत करण्यासाठी दृढ बांधिलकी दर्शवित आहे. सहकार्याच्या केंद्रीकृत केंद्राच्या रूपात हे केंद्र विद्वान आणि संशोधक यांच्या भावी पिढ्यांसाठी पाया घालणार आहे आणि नवीन द्विपक्षीय संबंध तयार करणार आहे व भविष्यात अर्थपूर्ण शैक्षणिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण सुलभ करणार आहे.

> "मेलबर्न विद्यापीठाचे ग्लोबल सेंटर दिल्लीत सुरू होणे हा एक महत्वपूर्ण टप्पा आणि हा विद्यापीठाची भारताप्रती असलेली दीर्घकालीन बांधिलकी ठळकपणे दर्शवित आहे. हे केंद्र शैक्षणिक आणि संशोधन संबंध मजबूत करण्यासाठी आणि सहकार्यास प्रोत्साहन देण्यासाठी एक केंद्र असेल. आर्थिक विकास आणि सामाजिक प्रभावासाठी एक प्रमुख चालक म्हणून शिक्षण आणि संशोधन हा ऑस्ट्रेलिया आणि भारत यांचा सामायिक दृष्टीकोन असून हे केंद्र या दृष्टीकोनाचे प्रतीक आहे. यामुळे विद्यार्थी आणि संशोधक यांना अशा नव्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत जिथे त्यांना दोन्ही देशांच्या परस्पर फायद्यासाठी नव उपक्रम करण्याकरिता व सामायिक आव्हानांना सामोरे जाण्याकरिता एकत्र येता येईल."
>
> **- फिलिप ग्रीन, ऑस्ट्रेलियाचे भारतातील उच्चायुक्त**

## पुलवामा हल्ल्यातील आरोपीचा मृत्यू

**श्रीनगर ।** पुलवामात पाच वर्षांपूर्वी सीआरपीएफच्या ताफ्यावर मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात ४० सीआरपीएफ जवान शहीद झाले होते. या हल्ल्याने संपूर्ण देश हादरला होता. दरम्यान या दहशतवादी हल्ल्यातील आरोपीचा मृत्यू झाला आहे. सोमवारी रात्री सरकारी मेडिकल कॉलेज रुग्णालयात त्याचा मृत्यू झाला. काकापोरा येथील हाजीबल गावातील बिलाल अहमद कुचे पुलवामा हल्ल्यातील १९ आरोपींपैकी एक होता. बिलाल दहशतवाद्यांना स्वत:च्या घरात आश्रय दिला होता आणि आतंकवाद्यांना रसद पुरवली होती. किश्तवाड जिल्हा कारागृहात आजारी पडल्यावर कुचे याला १७ सप्टेंबर रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. सोमवारी रात्री हृदयविकाराच्या झटक्याने त्याचा मृत्यू झाला.